# काळानुरुप विकासाच्या राजमार्गावर धावणारी बार्शी







स्वातंत्र्यपूर्व काळापासून दक्षिण भारताची उत्तरकाशी म्हणून संबोधले जाणाऱ्या बार्शी शहरामध्ये अकराव्या शतकातील धार्मिक, पौराणिक देवस्थान आहे. भगवान श्री महाविष्णूचे भगवंत अवतारातील मूर्ती असलेल्या या देवालयाचे पूर्वापार तीर्थक्षेत्र म्हणून तर महत्त्व आहेच पण काही शतकांचा इतिहास असलेल्या भागवत सांप्रदायाची महत्ती सांगणाऱ्या पंढरीच्या वारीला येणाऱ्या वारकाऱ्यांची पावले या शहराकडे द्वादश क्षेत्र म्हणून वळतात. तसेच बारा ज्योतीर्लिंगे आणि राजा अंबरीषाची तपोभूमी ही या शहराची धार्मिक वैशिष्ट्ये आहेत.

त्याचबरोबर मिरज ते लातूर या ब्रिटीशकालीन रेल्वे मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या बार्शी लाईट रेल्वेमुळे हे शहर सुप्रसिद्ध होते. त्याचबरोबर शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षपूर्ती झालेली नगरपालिका व राज्यातल्या दक्षिणोत्तर दिशांशी परराज्यातील व्यापारामुळे विकासित झालेली बाजारपेठ हे या बार्शीचे गतवैभव आहे. आशिया खंडातील ग्रामीण भागातील कर्करोगा-वरील सर्वात मोठे निदान, उपचार व संशोधन केंद्र असणारी बार्शी ५० वर्षांपूर्वी कर्मवीरांनी स्थापन केलेल्या आरोग्य मंदिरामुळे अनेक जिल्ह्यातील हजारो रुग्णांची सेवा करत आज मेडिकल हब बनले आहे.

बार्शी शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये १९३४ साली कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी स्थापन केलेल्या श्री शिवाजी बोर्डिंग व आज नावलौकिक प्राप्त श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा सिंहाचा वाटा आहे. बार्शी शहरामध्ये आज विविध उद्योग व कारखानदारीला पायाभूत सुविधा आणि पाठबळ देण्याचे काम ४ औद्योगिक वसाहतीमुळे झाले आहे. आज बार्शी शहरामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून उद्योगांसाठी सर्व सोयीसुविधायुक्त केंद्र पुढे जाण्याच्या प्रतिक्षेत बार्शीतील उद्योजक आहेत.

सर्वात मोठे उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेतीच्या माध्यमातून बार्शी तालुक्यात हरितक्रांती घडविण्यासाठी बार्शी तालुका उपसा सिंचन योजनेचे अनन्य साधारण महत्त्व आहे. सुमारे साडेसातशे कोटींचे विस्तारीत अंदाजपत्रक असलेल्या या योजनेमुळे तालुक्यातील १२ हजार ५५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. महायुती सरकारच्या काळात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन आमदार राजेंद्र राऊत यांनी केलेली मागणी उचलून धरत या योजनेला भरघोस निधी मंजूर करत कार्यारंभाचे आदेश देवून ही योजना गतिमान करुन कार्यान्वीत केल्यामुळे तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. बार्शी शहराला विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात १९९४ साली मंजूर झालेल्या उजनीवरुन येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेमुळे आत्तापर्यंत तारले असून तत्कालीन आमदार दिलीप सोपल यांच्या पाठपुराव्यामुळे ही योजना मंजूर झाली होती. आता काळाप्रमाणे नुतनीकरणाची गरज होती. त्यामुळे या योजनेला समांत्तर पाणीपुरवठा योजना महायुतीच्या काळात मंजूर झाली. आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झालेल्या २९६ कोटी रुपयांच्या योजनेमुळे भविष्यात बार्शी शहराच्या विस्तारलेल्या लोकसंख्येची पाणी पुरवठ्याची गरज पूर्ण होणार आहे. बार्शी तालुक्यात विधानसभा मतदारसंघामध्ये समाविष्ट वैराग भागातील ५७ गावेसुद्धा तालुका निर्मितीच्या प्रतिक्षेत आहेत. वैराग शहरामध्ये ४ वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाले. नुकतेच ग्रामीण रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी जागा मंजूर झाली आहे. या भागाच्या विकासाचा मुख्य आधार असलेला संतनाथ सहकारी साखर कारखाना पुर्नजीवनाच्या प्रतिक्षेत आहे. बार्शी तालुक्यातील लघु व मध्यम प्रकल्प, साठवण तलाव यामुळे तालुक्यातील सिंचन वाढले आहे. त्यामुळे आगामी काळात तालुका सुजलाम सुफलाम होण्याकडे शेतकरी डोळे लावून आहेत. बार्शी तालुक्या बरोबरच अलिकडे बार्शी शहरातील ऐतासिक वैभव वाढवणारी शिवसृष्टी महापुरुषांच्या पुतळ्यांचे माहेरघर झालेला पुतळा पार्क हे देखील या शहराच्या पर्यटन विकासाला मदत करीत आहे.



**अरुण बळप**
**बार्शी प्रतिनिधी**

बार्शी व परिसरातील हजारो नागरिकांच्या दिवाणी व फौजदारी खटल्यांची संख्या लक्षात घेवून विस्तारीत न्यायालयीन इमारतींच्या आराखड्यास मंजुरी मिळून बृहत न्यायालय बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे.

बार्शी शहराच्या चारही दिशांना रहिवाशी वस्तींची मोठी हद्दवाढ झाली असून शहरामध्ये मोठे समूह घरप्रकल्प आकारास येत आहेत. तसेच शहरामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचे उद्योगही पाय रोवून उभे राहत आहेत. विविध कारणांमुळे बार्शी शहर व तालुकावासिय विकासाच्या राजमार्गावर धावत आहेत. बार्शी तालुक्यात प्रामुख्याने शैक्षणिक, विविध नोकऱ्या या व अन्य कारणांमुळे तालुक्याच्या लगतच्या परिसरातील चाकरमानी पांढरपेश्या वर्गाची स्थायीक होण्याची मानसिकता वाढून मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ झाली आहे. बार्शी तालुक्यात कृषी, व्यापार, उद्योग यांनाही हळूहळू पुरक वातावरण निर्माण होत असून अन्न प्रक्रिया उद्योगाचाही प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वीच्या ज्वारी व दाळींच्या या प्रसिद्ध बाजारपेठेत आता अन्य अन्नधान्याची प्रक्रियाही वाढली आहे. बार्शी तालुक्यात प्रयोगशील शेतकऱ्यांचीही संख्या वाढत असून बार्शीच्या सीताफळ व द्राक्षांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळविले आहे. बार्शीच्या 'अ' वर्ग दर्जाच्या कृषी उत्पन्न बाजार समितीचा गेल्या सहा वर्षाच्या काळात मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे. या बाजारपेठेची उलाढाल वाढली आहे. मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची निर्मिती झाली असून केंद्र शासनाच्याही योजना कार्यान्वित आहेत. तसेच शेतीमाल तारण कर्ज योजना, वेअर हाऊस, कोल्ड स्टोअरेज योजाना यांचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. तसेच मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून राबविल्या गेलेल्या हमीभाव, खरेदी योजनांचा शेतकऱ्यांना लाभ झालेला आहे. भविष्य काळात बार्शी तालुक्यात उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून सिंचनाचा अनुशेष भरुन निघाल्यास हरितक्रांती घडेल व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल अशी अपेक्षा आहे. बार्शी तालुक्यात संतनाथ सहकारी साखर कारखान्याचे पुर्नजीवन होणे काळाची गरज असून तालुक्यात बंद पडलेला कुमदा आर्यन साखर कारखाना खा. बजरंग सोनवणे यांनी पुन्हा सुरु केला असून इंद्रेश्वर शुगरही धिम्यागतीने का होईना पण चालू आहे.

बार्शी तालुक्यातील बागायत क्षेत्र वाढीस लागले असून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने पावले पडत आहेत हे सुचिन्ह आहे. बार्शी तालुक्यात सहकारी तत्त्वावरील उद्योग व कारखानदारीच्या वाढीसाठी बार्शी तालुका उद्योग विकास को-ऑप. सोसायटीच्यामार्फत निर्माण झालेल्या चार औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून कारखानदारी वाढीस लागली आहे. परदेशामध्ये निर्यातीक्षम मालाचे उत्पादन करणारे कारखानदार या औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून निर्माण झाले आहेत. शहराच्या औद्योगिक विकासात महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या या औद्योगिक वसाहतींबरोबरच आता नव्याने कार्यान्वित होणाऱ्या महाराष्ट्र विकास औद्योगिक प्राधिकरणाच्या माध्यमातून




मोठ्या उद्योगांना फायदा होणार आहे.

बार्शी तालुक्याच्या दळणवळणाच्या वाढीमध्ये बार्शी ते लातूर या जुन्या रेल्वे मार्गाचे रुंदीकरण होवून बार्शीचा लोहमार्ग विविध महानगरांच्या रेल्वे मार्गांना जोडला गेला असून, मुंबईसह राज्य व परराज्यातील विविध महानगरांना बार्शीकर थेट जोडले गेले आहेत. त्यामुळे बार्शीचे नवीन रेल्वे स्टेशनसुद्धा बार्शीकरांसाठी मोठा सेतू ठरले आहे. त्यामुळे काळानुरुप विकासाच्या प्रवाहात बार्शीला चालना मिळाली आहे.

बार्शी तालुक्यातून सुरत-चेन्नई व शक्तीपीठ महामार्गही जातो आहे. त्यामुळे तालुक्यातील काही गावातील शेतकऱ्यांच्या भूसंपादनाचा मुद्दा जोडला गेला आहे. हे महामार्ग तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भवितव्याला तारक ठरणार की मारक ठरणार हे काळाच ठरविणार आहे. तसेच बार्शी शहरातून धाराशिव, तुळजापूर व सोलापूर हे मार्ग पुरवापार जोडलेले आहेत. सोलापूर रस्त्याचे अद्यायवत डांबरीकरण झाले असून तुळजापूर व धाराशिवकडे जाणाऱ्या मार्गांना माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नातून या मार्गांना राज्य शासनाकडून निधी मिळाला असून डांबरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. बार्शी तालुक्याच्या व्यापार, उद्योग, पर्यटन यांना चालना मिळण्याची गरज असून नुकतेच आमदार दिलीप सोपल यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात बार्शी हे द्वादशी क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. या तीर्थक्षेत्राकडे पंढरीच्या वारीला येणारे वारकरी द्वादशीला पारणे फेडण्यासाठी येतात. त्यामुळे या शहराचे व लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भगवंत दैवताची शासकीय महापूजा करावी अशी मागणी औचित्याचा मुद्दा मांडून केली होती. ही मागणी मंजूर झाली तर एक धार्मिक क्षेत्र म्हणून बार्शीचे महत्त्व वाढणार आहे. याचा परिणाम पर्यायाने बार्शीच्या अर्थकरणावर होणार आहे.

बार्शीच्या शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील उपलब्धीमुळे बार्शीकडे आकर्षिले जाणाऱ्या रहिवाशी व पायाभूत सुविधांच्या वाढीमुळे उद्योग व व्यापार क्षेत्राचे वैभव वाढणार असून भविष्यातल्या संभव्य सिंचनामुळे या तालुक्यातील हरितक्रांती घडली तर तालुक्याच्या विकासाचे महापर्व सुरु होईल व विकास रथाची घोडदौंड होईल यात शंका नाही.

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *



श्री. बालाजी कुकडे
पोलीस निरीक्षक,
बार्शी शहर पोलीस ठाणे.
फोन (०२१८४) २२३३३३

दै. तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



जय जिजाऊ
* शुभेच्छुक *
मराठा सेवा संघ तालुका बार्शी

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
कर्मवीर लोहोकरे गुरुजी
द्रष्टे समाज सुधारक
* कार्यकारी विश्वस्त मंडळ *
श्री. विनायकराव गणपतराव गरड
अध्यक्ष
श्री. बळवंतराव केशव पाटील
उपाध्यक्ष
छत्रपती शिवाजी महाराज
जाणता राजा
श्री. मदनलाल गुलाबचंद खटोड-खजिनदार, श्री. पंडितराव जनार्धन लोहोकरे-सचिव, श्री. अरुण रामराव भड-सह सचिव, श्री. अनिल माणिकराव गरड-संचालक, श्री. जीवन रामदास लोहोकरे-संचालक, श्री. वसंत त्रिंबकर काकडे-संचालक, श्री. डॉ. संतोष इंद्रसेन भड-संचालक, श्री. अक्षय अशोक भड-संचालक, श्री. महेश दत्तात्रय पाटील-संचालक, श्री. मधुकांत विनायकराव गरड-संचालक, श्री. विलास गजेंद्र लोहोकरे-संचालक, श्री. चव्हाण अरविंद तुकाराम-संचालक, श्री. अनिल धनाजी पाटील-संचालक, श्री. डॉ. विवेकानंद पोपट पाटील-संचालक
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गौडगांव, ता. बार्शी.
सर्व संचालक, सर्व शाखाप्रमुख व कर्मचारी वृंद

आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता प्रकल्प
दैनिक तरुण भारत
वर्धापन दिन... हार्दिक शुभेच्छा
SkillBook
स्किल बुक - एक कोटी विद्यार्थ्यांना एक लाख कौशल्याशी जोडूया..
केंद्र शासनाच्या स्टार्टअप इंडिया योजनेअंतर्गत डिप प्रमाणित संस्था
स्मितकिरण प्रकाशन संस्था, बार्शी, जि. सोलापूर

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
बार्शीकरांसाठी घेऊन येत आहोत
भव्य दिव्य 1 बीएचके फ्लॅट प्रकल्प...
GST No. 27AAXCA7555J1ZU
CIN No. U45203PN2022PTC215356





प्रो.प्रा. समीर वायकुळे सर
Reg.No. P52600080239
ओपन प्लॉट
बंगलो
रेडी फ्लॅट
रो हाऊसेस
अश्वविश्व बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा. लि.
समृद्धी अपार्टमेंट, कासारवाडी रोड, सुरश्री पार्क, गट क्रमांक ६३०/१, बार्शी. मो.नं. 9850798249

दै. तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...!
Kubota
कुबोटा जगातील नंबर १ जापनीज ब्रँड
कुबोटा छोट्या बरोबर आता मोठाही..!
भारतीय शेतीसाठी जपानी तंत्रज्ञान..!




आमच्याकडे 21HP, 24HP, 27HP, 34HP, व 45HP, 50HP, 55HP चे ट्रॅक्टर्स उपलब्ध.
के.टी. ट्रॅक्टर्स, बार्शी
हेड ऑफिस बार्शी : लातूर रोड, बार्शी.
मो. 9011885959 I 9767105959 kt.tractors@gmail.com
कुबोटा ट्रॅक्टर : सेल्स, सर्व्हिस अँड स्पेअर्स
धाराशिव ट्रॅक्टर्स, धाराशिव
सुरज ऑटोमोबाईल्स : सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ
सोहम ऑटोमोटिव्हज : पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस




# माढा गावातील 'चिलखती योद्ध्यांचे' ऐतिहासिक शिल्प व त्याचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय इतिहासातील महत्व




**जागतिक इतिहासाचे 'लष्करीदृष्ट्या' आकलन करत असताना वेगवेगळ्या भूखंडांतील लढवैय्यांनी वापरलेल्या शस्त्रांवर,बचावात्मक उपकरणांवर व त्यात होत गेलेल्या नाविन्यपूर्ण बदलांवर स्वतंत्रपणे अभ्यास केल्यास मानवी प्रगतीचा कालक्रमवार टप्पा आपल्यापुढे एका वेगळ्या अंगाने उभा राहतो त्यामुळे युद्धेतिहासाचे इतिहास संशोधनात स्वतंत्र महत्त्व आहे.जगभरातील लढवैय्या योद्ध्यांनी इतिहास काळात वापरलेल्या शस्त्रास्त्र व बचावात्मक उपकरणांवर काही निवडक अभ्यासकांनी स्वतंत्ररित्या संशोधन व लेखन केले आहे.आजच्या लेखात चिलखतांचा वापर व त्यात होत गेलेले बदल यावर आपण चर्चा करणार आहोत,यानुसार आतापर्यंतच्या संशोधनाचे सार हे सांगते की जागतिक स्तरावर लोखंडी चिलखतांचा वापर साधारण १३ व्या ते १५ व्या शतकापर्यंत युरोपीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणात होऊ लागला होता.या आधीची चिलखते चामड्याची व संमिश्र धातूंची असत परंतु चिलखताच्या निर्माणात लोखंडाचा वापर १३व्या शतकापासून पुढे वाढू लागला.**

भारतात १२व्या शतकापासून पुढे व विशेषतः तुर्कांच्या आक्रमणा नंतर 'प्रगत चिलखताचा' वापर सुरु झाला,तर मुघल काळात अत्याधिक प्रगत अशी पोलादी चिलखते बनू लागली असे सर्वसाधारणपणे मानले जाते. विशेषतः लोखंडी पट्ट्यांच्या चिलाखतांचा उदय हा प्रामुख्याने मुघल काळात झाला असे आत्तापर्यंत मानले जाई,मात्र माढा गावातील चिलखतयुक्त दांपत्याच्या स्मारकशिल्पामुळे हा इतिहास नव्याने लिहावा लागेल असे मला संशोधनातून वाटते.सीना खोऱ्याचा तथा माढा तालुक्याचा इतिहास पाहता १२व्या शतकात सीना खोऱ्याने कल्याणीच्या चाळुक्य व देवगिरीच्या यादवांतील सत्तांतर निकटतेने अनुभवले आहे.दक्षिण भारतातील विख्यात चाळुक्य साम्राज्याच्या कल्याणी शाखेतील सोमेश्वर चौथा(इ.स.११८१-इ.स.११८९) याच्या नंतर चाळुक्य सत्ता क्षीण झाली व चाळुक्य साम्राज्याचे विभाजन वेगवेगळ्या राजवटीत झाले-तेलंगणा स्थित वारंगळचे रट्ट काकतीय,कर्नाटक स्थित द्वारसमुद्रचे होयसळ/भोसळा उर्फ भोसले व म हाराष्ट्रातील देवगिरीचे यादव असे हे विभाजन होते. चाळुक्यांच्या राजवटीतील पलियंडा अर्थात आजच्या धाराशिव जिल्ह्यातील परांडा या प्रांतात ४०००गावे येत होती ज्यात सीना नदीच्या काठचा विस्तृत भागही होता जो पुढे देवगिरीच्या यादवांच्या प्रत्यक्ष अंमलात होता.तत्पूर्व नदीच्या पलीकडील भागावर चाळुक्यांच्या मांडलिक 'सेंद्रक' उर्फ 'सिंदक' या नागवंशज कुणब्यांचा अंमल होता तर अलीकडच्या काठावर सातवाहनांच्या वारसदारांचा अधिकार होता.

१९व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिश राजवटीत आजच्या मोहोळ तालुक्यातील(जि.सोलापूर) बरीच गावे माढा तालुक्यात समाविष्ट होती,पैकी 'वाफळे' गावी असलेल्या इ.स.१२९०दरम्यानच्या यादवकालीन शिलालेखानुसार सिंघण व जैत्रपाळ या यादव राजांचा प्रत्यक्ष अंमल येथे होता,दोन्ही राजांचा व त्यांच्या या भागातील अधिकाऱ्यांचा उल्लेख वाफळे शिलालेखात येतो,वाफळे हे पूर्वी माढा तालुक्यातच मोडत होते व चाळुक्यांनंतर येथे देवगिरीच्या यादवांच्या मांडलिकांचे राज्य होते.१४ व्या शतकापर्यंत माढ्यासह तालुक्यातील अनेक गावे यादवांच्या अधिपत्याखाली होती हे स्पष्ट होते.यादव सत्तेचा हा स्थैर्याचा काळ असल्याने या काळात स्थापत्यकलेला चांगलाच वाव भेटला, माढा तालुक्यात उपरोक्त कालखंडात बांधली गेलेली चाळुक्य व यादव कालीन मंदिरे व स्मारक शिल्पे गावोगावी स्थित आहेत,त्यापैकीच एक माढ्यावर राज्य करणाऱ्या अनामिक प्राचीन 'शासक दांपत्याचे' वैशिष्ट्यपूर्ण प्राचीन स्मारक शिल्प माढा गावातील मल्लिकार्जुन शिवालयाच्या आवारात स्थित आहे(छायाचित्र- ४)या स्मारक शिल्पावर शिलालेख नाही पण त्यावरील स्त्री व पुरूष योद्ध्यांनी चिलखत व शिरस्त्राण परिधान केल्याचे दिसत आहे हे या शिल्पाचे वेगळेपण आहे, कारण भारतात आजवर जेवढी स्मारकशिल्पे/वीरगळ अवगत झाली आहेत त्यांमध्ये सहसा चिलखत व शिरस्त्रानांचे अंकन क्वचितच आढळते.माढ्यातील उपरोक्त स्मारक शिल्पामुळे चिलखत व शिरस्त्राणाच्या वापराच्या आरंभाचा जो इतिहास सांगितला जातो त्याकडे नव्याने पाहावे लागेल.भारताचा युद्धेतिहास पाहता

भारतात लोखंडी पट्ट्यांच्या चिलखतांचा वापर साधारणपणे १६व्या शतकात सुरु झाला असे मानले जाते, तसे लिखित पुरावे मुघल कालीन साधनात मिळतात परंतु पूर्वमध्ययुगीन काळातील चिलखाताच्या वापराचा निर्देश देणारे 'शिल्प स्वरूपातील' पुरावे/अवशेष समग्र भारतात अत्यंत दुर्मिळ आहेत.मात्र माढा गावातील शिल्प हे सिद्ध करते की साधारण १२व्या ते १४व्या शतकात 'लोखंडी पट्ट्यांची चिलखते(झश्ररींशारळश्र ोीं)' वापरात येऊ लागली होती व येथील स्थानिकांनी ती विकसित केली होती.

प्राचीन भारतीय साहित्यात आपणास प्रारंभिक बचावात्मक उपकरणे कशा प्रकारची होती याचा अंदाज येतो.सर्वप्रथम चिलखतासमान उपकरणास वैदिक साहित्यात 'वर्मन' असे संबोधले आहे,यास एखादा कोट परिधान करावे तसे परिधान केले जाई व हे उपकरण प्राण्यांच्या कातडीचे वा मिश्र धातूपासून बनविले जाई,तर असेच एक उपकरण लोहापासून बनविले जाई ज्यास 'कवच' म्हंटले आहे व ते तागाच्या गाठीपासून बनविले जाई,याशिवाय उत्तर वैदिक काळात भारतीय योद्धे चामड्याचे किंवा प्राण्यांच्या कातड्याचे जाडजूड आवरण चिलखत म्हणून वापरत असत. महाभारताच्या हस्तलिखितामध्ये 'योद्ध्यांच्या छातीच्या संरक्षणासाठी बचावात्मक आवरण(चामड्याचे)' बनविणाऱ्या चर्मकारांचा उल्लेख आहे.यजुर्वेदामध्ये छातीचे संरक्षण करण्यासाठीच्या आवरणाचा उल्लेख आहे, तर म हाभारतातील भीष्म पर्व,द्रोण पर्व यांमध्येही चिलखत सदृश्य बचावात्मक आवरणाचा उल्लेख आला आहे.'द्रपी' नामक एक अंगसंरक्षक आवरण असे जे चामड्यापासून व कापडा पासून एकत्रित बनविले जाई असा उल्लेख ऋग्वेदातही आला आहे-परंतु यामध्ये लोखंडाचा वापर केला जात असल्याचे पुरावे मिळत नाहीत,शिवाय प्राचीन साहित्यात संरक्षक उपकरणांचा उल्लेख येतो



खरा,पण ती कशा स्वरूपाची असत हे दर्शविणारे दृश्य पुरावे मात्र उपलब्ध नाहीत. इ.स.१ल्या शतकापूर्वीचा असा दृश्य स्वरूपातील दुर्मिळ पुरावा म्हणजे कुशीनार नगरीचे शिल्पांकन केलेला मध्यप्रदेशातील सांची



मयूर चव्हाण,
सोलापूर
९६२३६५०२९१

स्तुपावरील दक्षिण कमानी जवळचा शिल्पपट होय,या मध्ये चिलखतधारी योद्धे दर्शविले आहेत,त्यांचे निरीक्षण केल्यास आपल्या लक्षात येते की वैदिक व वैदिकोत्तर साहित्यांत आलेल्या

वर्णनांतील संरक्षक उपकरणे प्रस्तुत शिल्पपटातील योद्धयांनी धारण केली आहेत,ती कंबरेपासून वर छातीपर्यंत गुंडाळलेली चामड्याची व वस्त्राची संमिश्र चिलखते असल्याचे लक्षात येते(छायाचित्र क्र.१).कौटिल्याच्या अर्थशास्त्रात १८व्या अध्यायात 'लोहजालीका'चा उल्लेख आला आहे,लोहजालीका म्हणजेच लोखंडाच्या छोट्या साखळ्यांपासून विणलेले जाळीसारखे बचावात्मक वस्त्र होय. सर्वप्रथम चिलखता समान उपकरणाचे प्रारंभिक चित्रण सातवाहन काळातील इंडो-सिथियन नाण्यांवर २रे ते ३रे शतक या काळात वासुदेव या राजाच्या सोन्याच्या नाण्यावर दिसते(छायाचित्र २).या सोबतच कुषाण काळातील कुमार कार्तिकेयाच्या एका शिल्पात कार्तिकेयाच्या देहावर 'चिलखता समान काहीसे' दर्शविले आहे.अभ्यासकांच्या मते ते लोखंडी चिलखताचे प्रारंभिक स्वरूप असावे.भारतीय इतिहासात चिलखता समान बचावात्मक उपकरणाचा आद्य शिलालेखीय उल्लेख गुजरातचा चालुक्य राजा मुलराज याच्या शिलालेखात सापडतो असे पीटर या संशोधकाने नोंदवले आहे. उदयप्रभा सुरी(इ.स.१२२१-इ.स.१२४३) हा त्याच्या 'सुक्रित कीर्ती कल्लोलिनी' या साहित्यात चिलखतासम ान अंगसंरक्षक उपकरणाचा उल्लेख करतो,सुरीच्या वर्णनानुसार नाइकीदेवीने मुलराजास एक सैन्य तुकडी देऊन म्लेंच्छ(तुर्क) आक्रमाकां विरोधात लढण्यास पाठविले,त्या तुर्कांनी शिरस्त्राण व चिलखते परिधान केली होती असा उल्लेख तो करतो,अभ्यासकांच्या मते सदर चिलखत हे साखळ्यांच्या गाठींनी बनविले जाई. परंतु लोखंडी पट्ट्यांच्यज्ञ मजबूत चिलखताचा भारतात वापर खऱ्या अर्थाने मुघल काळात १६व्या शतकापासून पुढे मोठ्या प्रमाणात सुरु झाला असे मानतात. भारताच्या प्रारंभिक इतिहासाचा एकूण विचार केल्यास लोखंडाचा शोध ही एक मोठी क्रांती होती,भारतात लोखंडाचा प्रत्यक्ष्य वापर साधारण इ.स.पूर्व १००० पासून सुरु झाला हे तर सर्वमान्य आहेच, परंतु व्यक्तीशः चिलखता सारख्या संरक्षक वस्तूच्या

निर्मितीमध्ये लोखंडाचा वापर मोठ्या प्रमाणात व्हायला जवळपास १६वे शतक उजाडले. असे असताना माढा या गावी मल्लिकार्जुन शिवालयाच्या आवारातील एका शासक दांपत्याच्या सशस्त्र स्मारक शिल्पात मात्र त्या योद्ध्यांच्या देहावर चिलखता सारख्या बचावात्मक उपकरणाचे सुस्पष्ट शिल्पांकन केलेले दिसून येते.या शिल्पावर शिलालेख नसला तरी शिल्पाचे कोरीव काम पाहता ते साधारण १२व्या ते १३व्या शतकातील असल्याचे कळते.या स्मारक शिल्पामधील दांपत्याने आपल्या देहावर चिलखता समवेत शिरस्त्राणेही धारण केली असल्याचे ठळक दिसते,दोहोंपैकी पुरुषाच्या शिल्पांकनात तलवार,ढाल यासह जे चिलखत दिसत आहे ते मुघल काळातील व मराठा काळातील लोखंडी पट्ट्यांच्या चिलखतांचे प्रारंभिक रूप आहे असे मला संशोधनातून वाटते. शिवकाळात महाराष्ट्र व दक्षिण भारतात ज्या धाटणीची लोखंडी पट्ट्यांची दख्खनी चिलखते बनवली जात त्यांची रचना(छायाचित्र ३)व प्रस्तुत शिल्पातील चिलखताची रचना यात साम्य दिसते, अर्थातच शिवपूर्व कालीन व शिवकालीन चिलखतांची निर्मिती ही माढ्यातील स्मारक शिल्पातून समजते.

माढा गावातील या स्मारक शिल्पात दिसणारे पुरुषाच्या छातीवरील चिलखत हे स्पष्ट करते की दक्षिण भारतात पूर्वमध्य युगात लोखंडी पट्ट्यांची चिलखते वापरात होती व तत्कालीन स्त्रियांसाठीही स्वतंत्र धाटणीची बचावात्मक चिलखते किंवा Breastplate वापारात होती, अशा प्रकारचे दृश्य पुरावे भारतभरात बहुधा उपलब्ध नसल्याने माढा गावातील प्रस्तुत शिल्पाचे राष्ट्रीय इतिहासातील अनन्यसाधारण महत्व अधोरेखित होते आहे.





साहित्यिक वर्णनांना दुजोरा देणारे दृश्य पुरावे उपलब्ध नसल्याने बरीच संशोधने केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहिली आहेत परंतु माझ्या या दाव्याला दुजोरा देणारा दृश्य रूपातील प्रबळ पुरावा म्हणजे माढा गावातील स्मारक शिल्प होय. भारतीय इतिहासाचे लष्करी दृष्ट्या आकलन करत असताना माढा गावातील या शिल्पाचा विचार करावा लागेल असे माझ्या संशोधना दरम्यान मला वारंवार जाणवले. या शिल्पाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ सशस्त्र पुरुषाचे चित्रण नसून धनुष्ययबाणधारी सशस्त्र स्त्रिचेही शिल्पांकन दिसते,अर्थात माढा व परिसरावर साधारण १२व्या ते १४व्या शतकात नुसता कोणी राजा वा मांडलिकच राज्य करत नव्हता तर स्त्री शासिकाही या परिसरावर समान अधिकाराने राज्य करीत असे व प्रस्तुत शिल्प पाहता ती प्रसंगी शस्त्रसंभार करून रणभूमीतही उतरत असे हेच यातून सिद्ध होते व या शिल्पातून तत्कालीन समाज चित्रण डोळ्यांपुढे उभे राहते. हे दांपत्य प्रजेचे रक्षण करताना युद्धभूमीवर धारातीर्थी पडले असणार यामुळेच त्यांचे सशस्त्र स्मारक शिल्प तत्कालीन ग्रामवीसीयांनी कोरविले आहे. या शिल्पातून तत्कालीन वस्त्र,आभूषणे,शस्त्रे,शिरस्त्राणे इत्यादींचा स्वरूप आपल्या लक्षात येते.जगभरातील युद्धेतिहासाच्या अभ्यासकांसाठी हे शिल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या दुर्मिळ ऐतिहासिक शिल्पाचे जतन करण्यासाठी मी माढा गावातील ग्रामस्थांच्या सहायाने शासकीय पातळीवर प्रयत्न करत आहे.












# अक्कलकोटला धार्मिक पर्यटनाच्या विकासाची मोठी संधी

**अश्वीन शुक्ल पंचमी शके १७७९ इ.स १८५७ ला नवरात्री उत्सवाच्या पाचव्या माळे दिवशी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज प्रज्ञापुरी नगरीतील म्हणजे सध्याच्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील खंडोबा मंदिराच्या कट्टयावर सर्वप्रथम आले . (खंजेबा मंदिर फोटो) स्वामीचे येथे बावीस तेवीस वर्ष वास्तव्य होते स्वामी समर्थ महाराज यांच्यामुळे अक्कलकोट आज भारताच्या नव्हे तर जगाच्या नकाशावर नावारूपास आले आहे . स्वामीमुळेच आज अक्कलकोटी व्यापार वृद्धी धार्मिक पर्यटन व्यवसाय यामुळे अनेक कुटुंबाचा यावर उदरनिर्वाह चालतो स्वामी भक्त पर्यटक यात्री हाच इतला मोठा ग्राहक आहे ग्राहकाना चांगली सोयी सुविधा आदरतिथ्य चांगली वागणुक आपुलकीने भाविकांची मने जिंकणे त्यांचा येथे निर्भय सुखकर वावर होणे गरजेचे आहे . येथे येणेरा प्रत्येक माणुस येथे अधिक काळ राहण्यास येथील स्वामी चा भक्ती महिमा स्थान महात्म सांप्रदायिक नित्य काकडा नैवेद्यारती पुजा पठण संस्कृती याबद्दल भाविकांची जागृती ओढ . स्वामी चरित्राचा प्रसार प्रचार केल्यास अक्कलकोट धार्मिक पर्यटन स्थळाचे पर्यटन हब म्हणून विकसित होण्यास मोठी संधी आहे.**





'श्री स्वामी समर्थांच्या लीलाचरित्रात श्री स्वामी समर्थ महाराज प्रथम श्रीशैल कर्दळी वनातुन प्रकट झाल्याचा उल्लेख आढळतो . कलकत्ता बांगलादेश कालिका देवीचं दर्शन हरिद्वार केदारेश्वर हैद्राबाद नंतर मंगळवेढयास वास्तव्यास (इ. स. १८३८ ते १८ ५० ) गेले. पंढरपुर बेगमपुर मोहोळ सोलापुरहुन अक्कलकोटी आले. २२ वर्ष अक्कलकोटी वास्तव्य केले. अक्कलकोट चा परिसर त्यांच्या अनेक लिला कार्यान पावन झालेला आहे.

अक्कलकोट हे पुर्वी स्वतंत्र संस्थान होतं सन १८७९ च्या सुमारास श्रीमंत राजे मालोजीराजे भोसले हे संस्थानिक राजे विराजमान होते . श्री स्वामी समर्थाच्या लिला विषयी स्वामीभक्त श्री गोपाळबुवा उर्फ प्रितीनंद स्वामीकुमार यांनी बखर लिहली ते महाराजांच्या जवळ असताना त्यांनी समक्ष पाहिलेल्या तेथील सेवकांनी सांगितलेल्या ऐकलेल्या स्वामीच्या लीला मोडीमध्ये लिहुन ठेवलेल्या चिपळून येथील मठात आहेत. श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या लिला चरित्र कार्य विषयी गुरुलिलामृत या ग्रंथात विस्तृत स्वरूपात विवेचन आहे. अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज चरित्र आणि कार्य हे श्रीपाद शास्त्री किंजवडेकर लिखित स्वामीचे चरित्र देखील उपलब्ध आहे स्वामी समर्थांचे भारत भ्रमण समर्थाचे विविध नावाने परिचय त्यांच्या अवतार कार्या विषयी किर्ती वर्णावी तेवढी कमीच आहे विशाल सागरातील पाणी आपण मोजु शकत नाही याप्रमाणे समर्थाची किर्ती वर्णन करण्याकरिता आपली बुद्धी तोकडी पडते आज समर्थाची अनेक मंदिरे मठ उभी राहिली आहेत . स्थान महात्म्य म्हणून समर्थाच्या पदस्पर्शानं लिला कार्यान पावन झालेल्या



अक्कलकोट तीर्थक्षेत्राचे महात्म्य वेगळेच आहे . स्वामीची अक्कलकोट तीर्थक्षेत्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर ,बुधवार पेठ येथील स्वामीचे समाधी मठ ,' स्वामी प्रथम आले ते खंडोबा मंदिर ,स्टेशन रस्ता येथील राजेराय मठ , कुंभार गल्लीतील जोशी मठ ,राम गल्ली येथील स्वामीचे शिष्य बाळप्पा महाराज मठ म्हणजेच गुरु मंदिर' ' श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व श्री स्वामी समर्थ विश्रांती धाम बैगेहिळ्ळी ,आदि स्वामी ची मंदिरे आहेत . स्वामीची पुण्यतिथी चैत्र वदय १३ ( त्रेवदशी ) प्रगटदिन गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी , दत्तजयंती गुरुप्रतिपदा गुरुपोर्णिमा त्रिपुरारी पोर्णिमा , ' आदि उत्सवास व सलग सुट्या काळात अक्कलकोट तीर्थक्षेत्री प्रचंड गर्दी होते भाविकानी एकाच वेळेस एकाच मंदिरात दर्शनार्थ गर्दी केल्यास भाविकाना दर्शनार्थ अधिक वेळ जाऊ शकतो यामुळे भाविकांनी अक्कलकोट येथील स्वामीच्या इतर मठातही स्वामीचे दर्शन घेतल्यास भाविकांची गर्दी विभागली जाऊ शकते .यामुळे भाविकां नी इतर मठातही स्वामी दर्शनास प्राधान्य दिल्यास अक्कलकोट तीर्थक्षेत्री एकाच मठात मंदिरात होणारी गर्दी टाळता येणे शक्य आहे . यामुळेच अक्कलकोट तीर्थक्षेत्री स्वामीची इतर असलेली मंदिराची माहिती असणे भाविकांना आवश्यक आहे .




- नंदकुमार जगदाळे
अक्कलकोट
८८८८७४०७८०


वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिर पासुन काही अंतरावर कुंभार गल्ली येथे नवसाला पावणारा सर्व विघ्न दुर करणारा अशी ख्याती



असलेला पुरातन सिध्दीविनायक मंदिर आहे . अक्कलकोट तीर्थक्षेत्री आल्यावर सिद्धीविनायकाचे दर्शन घ्यावेच यानंतर काही अंतरावर स्वामी चरित्रातील टोळ यांचा मठ म्हणजेचे सध्याचा स्वामी चा जोशी मठ म्हणून परिचित आहे स्वामी भक्तानी अनेक मंदिरातील प्रजंड गर्दी टाळण्यासाठी जोशी मठ येथेही स्वामी समर्थाचे दर्शन घेऊ शकता . स्वामी चरित्रा मध्ये शेख नुर बाबा दर्गाह चा उल्लेख आहे . स्वामी मंदिर शेजारील हत्तीतलाव जवळ शेख नुरोद्दीन दर्गाह आहे . येथे स्वामी भक्त दर्शन घेऊ शकतात . स्वामीनी दिक्षा दिलेले एकमेव शिष्य असा उल्लेख बाळप्पा महाराज यांचा केला जातो . बाळप्पा महाराज याचा मठ अर्थात गुरु मंदिर भारत गल्ली मध्ये आहे . बाळप्पा महाराज यांचे उत्तराधिकारी गंगाधर महाराज यांचे उत्तराधिकारी अक्कलकोट निवासी गजानन महाराज यानंतर श्रीकांत महाराज राजीमवाले डॉ पुरुषोत्तम



महाराज राजीमवाले यांनी अग्निहोत्र चा जगभर प्रचार प्रसार केला . पर्यावरण शुद्धीसाठी अग्निहोत्र गरजेच आहे हे पटवुन दिल . शहराच्या २ किमी अंतरावर स्टेशन रस्त्यावर यज्ञनगरी शिवपुरी येथे अंत्यत शांत परिसरात आकर्षक रमणीय शिवमंदिर आहे .येथे सोमयाग यज्ञ केलेले स्थान आहे .यज्ञस्तंभ परशुराम यांची आकर्षक मुर्ती गजानन महाराज यांची मुर्ती माता सोना माता मंदिर आहे . अग्निहोत्र बाबत येथे प्रचार प्रसार मार्गदर्शन केले जाते . अकलकोट तीर्थक्षेत्री आलेला प्रत्येक भाविक यात्री पर्यटक येथे भेट द्यावी असे हे स्थान आहे .



**राजेराय मठ :-** शहरातील मध्यवर्ती भागातील स्टेशन रस्त्यावरील राजेराय मठ येथे ही स्वामीच्या पादुका भव्य मुर्ती प्रेक्षणिक आहे भाविकाना येथे सर्व सोर्यांनी युक्त राहण्याची सोय आहे .

**श्रीस्वामी समर्थ विश्रांती धाम**

शहराच्या तीन किमी अंतरावर बॅगेळी येथील स्वामी समर्थ विश्रांती धाम मंदिर आहे श्रीगुरु लिला मृत स्वामीच्या चरित्र ग्रंथांत स्वामी समर्थ महाराज छोट्या छोटया प्राणी मात्रावर कृपा कटाक्षाने कशा पद्धीतीने दया करून जीवन उध्दार करीत या चे विवेंचन आहे .

**स्वामीचे बुधवार पेठ येथील समाधी मठ**

स्वामीचे पटशिष्य म्हणून स्वामी भक्त चोळप्पा महाराज यांचा उल्लेख केला जातो स्वामी हयात असतानाच चोळप्पा महाराजांनी स्वामीच्या निर्वाणानंतर त्यांच्या घरी च ब्रम्हानंदी गुहा समाधी स्थान निर्माण केले होते असा उल्लेख चरित्र ग्रथांत आढळतो .

**स्वामी भक्त बाळप्पा महाराज तपोभुमी हक्क्याचा मारुती**

हे स्थान गुरु मंदिरानंतर अवघ्या काही अंतरावर आझाद गल्ली येथे आहे . बाळप्पा महाराज येथे तपश्चर्या केली ते मारुतीचे मंदिर आहे .



**बारा ज्योर्तिलिंग मंदिर :-** गुरुमंदिर पासुन काही थोड्याश्या अंतरावर सुभाष गल्ली येथे पुरातन १२ ज्योर्तिलिंग मंदिर आहे

**गौडगाव जागृत मारुती :-** अक्कलकोट शहरापासुन ११ किमी अंतरावर असलेल्या अक्कलकोट रोड रेल्वे स्टेशन पासुन अवध्या ४ किमी अंतरावर असलेला गौडगाव दक्षिण मुखी मारुती मंदिर अलीकडील काळात नावारूपास आलेले जिल्ह्यातील अनेक भाविकांचे मोठे श्रद्धास्थान बनले आहे जिल्ह्यातुन प्रत्येक शनिवारी मारुतीचं दर्शनार्थ येणाऱ्या भाविकांची संख्या झपाट्याने वाढत आहे

**सर्व धर्मीयांचे राष्ट्रीय एकोप्याचे श्रध्दास्थाने**

येथील सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान सिद्धयप्पा महाराज अंत्यत पुरातन धार्मीक स्थळ आहे . या भव्य दिव्य श्रध्दास्थान देवस्थान इमारती च्या दक्षिण बाजुकडील बंद दाराच्या बाजुने मुस्लीम समाज बांधव व उत्तर बाजुच्या बंद दरवाजा बाजुन हिंदु बांधव गुण्यागोविंदाने आपआपल्या परंपरेप्रमाणे धार्मीक विधी पुजा आराधना करतात . राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक म्हणून मोठ्या अभिमानान सांगण्या सारखे हे उदाहरण आहे

याच धर्तीचे हैद्रा येथील सर्व धर्मी यांचे श्रद्धा स्थान म्हणून हजरत ख्वाजा सैपन मुलुक दर्गाह याचा उल्लेख करावा लागेल. उडगी येथील जिंदावली दर्गाह येथेही मोठया प्रमाणात सर्व धर्मीय लोक येथे दर्शनार्थ येतात . अक्कलकोट तालुक्यात सर्व धर्मीय लोक शेख नुर बाबा दर्गाह दर्गाह दाता पिर दर्गाह हैद्रा उडगी बऱ्हाणपुर येथे यात्रा उत्सव मोठया गुण्यागोविंदाने एकत्रित पणे शांततेन साजरा करतात . अक्कलकोट तालुक्यातील सर्व धार्मिक स्थाने येथे धार्मीक पर्यटनार्थ मोठी सोयी सुविधा करून धार्मीक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यास मोठा वाव आहे .






























## भविष्याचा वेध घेणारा चाटे शिक्षण समूह
### बार्शी शहर व तालुक्यात अनेक होतकरु विद्यार्थी घडविण्याचे अतुलनीय कार्य

ग्रामीण भागातील मुलांना शहरात राहणाऱ्या मुलांप्रमाणे शैक्षणिक व्यवस्था, स्पर्धात्मकता आणि चांगली गुणवत्ता मिळावी याकरिता १९८६-८७ मध्ये प्रा. मच्छिंद्र चाटे आणि प्रा. गोपीचंद चाटे या बंधूंनी चाटे कोचिंग क्लासची मुहूर्तमेढ रोवली. महाराष्ट्रात पहिल्यांदाच एकाच छताखाली शिक्षण ही संकल्पना चाटे बंधूंनी राबविली. त्या काळात ग्रामीण भागात कोचिंग क्लासेस उपलब्ध नव्हते. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता विकसित व्हावी यासाठी १९८७ मध्ये औरंगाबादमध्ये (सध्याचे छत्रपती संभाजीनगर) चाटे कोचिंग क्लासेसची सुरुवात झाली. चाटे बंधूंनी लावलेले या रोपट्याचे आज महावृक्षात रुपांतर झाले आहे. या समूहामध्ये चाटे कोचिंग क्लासेस, चाटे ट्युटोरियल, चाटे पब्लिकेशन, चाटे स्कूल, चाटे ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, चाटे आयआयटी, जेईई, नीट अकॅडमी, भास्कराचार्य प्रतिष्ठानचे कार्य सुरु आहे.

**बार्शी शाखेची घौडदौड :**

चाटे शिक्षण समूह कोल्हापूर विभागाचे संचालक प्रा. डॉ. भारत खराटे यांच्या मार्गदर्शनातून बार्शी येथे २०१४ सालापासून चाटे शिक्षण समूहची शाखा प्रा. पांडुरंग घाडगे यांनी सुरु केली. सध्या या शाखेत इयत्ता पाचवी ते दहावीमधील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गेल्या दहा वर्षात बार्शी शाखेने दहावी बोर्ड परीक्षेचा १००% निकाल दिलेला पाहावयास मिळतो. इयत्ता पाचवीपासूनच CET, NEET, JEE सह Foundation ची तयारी बार्शी शाखेमध्ये होत असल्यामुळे 'बार्शीचा चाटे पॅटर्न' हा राज्यात अव्वल स्थानी ठरला आहे. बार्शी शहर व तालुक्यात अनेक होतकरु विद्यार्थ्यांना घडवण्याचे अतुलनीय कार्य चाटे शिक्षण समूहाकडून केले जात आहे. विद्यार्थ्यांची परिपूर्ण तयारी करुन प्रगतीची हमी देणारा बार्शी शहर व तालुक्यातील हा अग्रगण्य क्लास ठरला आहे.

Chate
The Symbol of Merit

**चाटे नोट्स व पेपर खूप उपयुक्त :**

चाटे कोचिंग क्लासेस मध्ये मार्गदर्शन मिळालेली आणि एसएससी बोर्ड परीक्षा २०२४ परीक्षेत महाराष्ट्रात अव्वल ठरलेली संचिता महाजन म्हणते इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये मिळालेले सर्वोत्तम मार्गदर्शन माझ्या उज्वल भविष्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. चाटे ग्रुपकडून असे मार्गदर्शन मिळाल्याने मी स्वतःला भाग्यवान समजते. चाटेच्या नोट्स खूप उपयुक्त आहेत. त्यासोबत दर रविवारी क्लासेसमध्ये घेण्यात येणारे युनिट पेपर हे महत्त्वाचे आहेत. पेपर व नोट्सच्या



माध्यमातून माझी फाउंडेशनची तयारी खूप छान झाली.

यशाचा गुरुमंत्र वयोग्य मार्गदर्शनासह नियोजनबद्ध आणि कठोर परिश्रम आपणास उज्वल भविष्याकडे घेऊन जातात. हाच चाटे क्लासेसचा यशाचा गुरुमंत्र आहे. मला परीक्षेच्या दृष्टघकोनातून योग्य मार्गदर्शन करण्याच्या कामी चाटे क्लासेसने कोणतीही कसूर केली नाही. नियमित अभ्यास व चाटे क्लासेसने योग्य वेळी दिलेले योग्य मार्गदर्शन याचा मला खूप फायदा झाला. असे एसएससी बोर्ड परीक्षा २०२५ मधील टॉपर समर्थ थिटे याने सांगितले.

**नवी पिढी सक्षम बनविण्याची गरज :**

चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे संचालक प्रा. पांडुरंग घाडगे संस्थेच्या कामाबद्दल म्हणतात, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, जेणे करुन ते उच्च दर्जाचे जीवन जगण्यासाठी चांगले आर्थिक स्रोत मिळू शकतील, अशी विद्यार्थी व पालकांची तीव्र इच्छा असते. आजचा विद्यार्थी आणि पालक शिक्षणाबद्दल खूप जागरुक आहेत.

उज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्याची हीच वेळ आहे. चाटे शिक्षण समूहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देणे, आत्मीयतेने शिकवणे आणि प्राधान्य देणे हा आमच्या कार्यप्रणालीचा भाग आहे.

खरे तर आपले उज्वल भविष्य केवळ नवीन पिढीवर अवलंबून आहे. आजच्या स्पर्धात्मक जगात त्यांना कौशल्य आणि क्षमतेच्या आधारे जगातील आव्हानांना तोंड देण्यास सक्षम बनविणे अत्यंत गरजेचे आहे.

## श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शीचे शतकोत्तराकडे वाटचाल

श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी या संस्थेची स्थापना बार्शीतील नामवंत वकील व उद्योगपती कै. भगवंत उर्फ काकासाहेब सुलाखे यांनी ८ मार्च १९४९ रोजी केली. आजपावेतो संस्था ७७ व्या वर्षात दमदार पावलाने वाटचाल करीत आहे. याच संस्थेचे आधारस्तंभ म्हणून ज्यांचे नाव आजही आदराने घेते जाते असे आपल्या सर्वांचे पितृतुल्य नेतृत्व म्हणजे सहकार तपस्वी कै. ल.ग. तथा तात्यासाहेब देशमुख. यांचा जन्म बार्शीतील सराफी व्यावसायिक देशमुख घराण्यात दि. १४ सप्टेंबर १९२९ रोजी झाला व त्यांनी बार्शी शहरात जुन्या मॅट्रीक हे शिक्षण पूर्ण करुन वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी त्यांनी श्री भगवंत सहकारी या संस्थेत कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानीवडेकर यांचे मार्गदर्शनाखाली कामास सुरुवात केली.

लहान वयातच प.पू. गोळवलकर गुरुजी, स्वामी विवेकानंद, रमण महर्षी इ. सत्पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक साधा लहान स्वयंसेवक म्हणून व भगवंत सहकारीची नोकरी सांभाळून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सतत चालू ठेवले. भगवंत सहकारी संस्था ही आपले कुटुंबच आहे असे समजून संघाची अंगात असलेली शिस्त व कै. काकासाहेब सुलाखे व कै. नानीवडेकर यांचे व्यवसाय चातुर्याच्या मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी या संस्थेचे सर्व सूत्रे सन १९६० साली एकहाती घेवून संस्थेचा कारभार यशस्वीपणे सुरु केला.

संस्थेच्या माध्यमातून विविध उद्योग व्यवसाय व प्रयोगशील उपक्रम राबवून संस्था हाच माझा प्रपंच अंगीकारुन ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले. त्यांचे बोलण्यातील स्पष्टपणा व व्यवसाय चातुर्य या बळावर त्यांनी संस्थेचे नांव सहकार क्षेत्रात पूर्ण महाराष्ट्र राज्यात परिचित करुन दिले. श्री भगवंत सहकारी या संस्थेचे सन १९६७ साली ग्राहक सहकारी संस्थेत रुपांतर करुन इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांची डिझेल, पेट्रोल व केरोसीनची डिलरशीप मिळवून सोलापूर, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यात व्यवसाय सुरु केला. तसेच किराणा भुसार, वह्या वितरण, सिमेंट, रासायनिक खते, प्रिटींग प्रेस, ऑईल मिल, दाळ कारखाना, यंत्रमाग व्यवसाय, दूध डेअरी, पतसंस्था, भगवंत बझार,

शब्दांकन
**अरुण बळप, बार्शी**

शासनामार्फत बार्शी तालुक्यात कडबा तगाई, मोफत गहू वाटप केंद्र, प्रौढ शिक्षण केंद्र इत्यादी अनेक व्यवसाय ना नफा ना तोटा या भावनेतून सामाजिक बांधिलकी म्हणून चालू ठेवले होते.

सहकाराच्या माध्यमातून सामाजिक ऋण फेडता येत नाही म्हणून भारतीय संस्कार केंद्र या न्यासाची १९७४ साली स्थापना करुन अनेक सामाजिक शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविले व जनसामान्यपर्यंत संस्थेची ओळख निर्माण करुन दिली. संस्थेची वार्षिक उलाढाल २५ ते ३० कोटीपर्यंत नेवून संस्था कायम नफ्यात ठेवून व ऑडीट वर्ग 'अ' ठेवून संस्थेच्या सभासद व ग्राहक व हितचिंतकांसाठी अनेक उपक्रम राबवून त्यांचा फायदाच करुन दिलेला आहे.



त्यामुळे आजही महाराष्ट्रात सहकार क्षेत्र किंवा धार्मिक क्षेत्र असो त्यामध्ये आजही कै. तात्यासाहेबांचे नावाचा उल्लेख आदराने केला जातो.

कै. तात्यासाहेब यांचे निधन २२ जून २०११ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वार्धक्यामुळे झाले व संस्था आधारहीन झाली. कै. तात्यासाहेब यांचे अंगी असलेल्या नेतृत्व गुणामुळे आज भगवंत सहकारी संस्थेची ७७ व्या वर्षाकडे वाटचाल सुरु आहे. कै. तात्यासाहेब यांचे नेतृत्वाखाली झालेली संस्थेच्या कामाची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने २०१२ साली संस्थेस 'आदर्श संस्था' हा पुरस्कार प्रदान केलेला आहे.

कै. तात्यासाहेब यांचे निधनानंतर संस्थेवर सन २०१३ साली आलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे संस्थेच्या बाबतीत राज्यभर अफवा, गैरसमज व संस्थेच्या कामकाजात अनेक हितचिंतकांनी निर्माण केलेले अडथळे यावर संस्थेच्या आजी, माजी संचालकांनी व सेवक वर्गाने एकत्रित बसून कै. तात्यासाहेब यांनी एवढ्या कष्टाने उभारलेली संस्था बंद पडू नये म्हणून प्रयत्न करुन एकविचाराने सन २०१४-१५ मध्ये संस्थेचे सर्व व्यवहार सुरळीत चालू केले असून संस्थेची सन २०२१ अखेर उलाढाल १३ ते १४ कोटींची असून संस्था सध्या 'अ' वर्गात आहे. तसेच सभासदांसाठी अनेक उपक्रम राबवून दरवर्षी सभासदांना लाभांश वाटप करीत आहे.

महाराष्ट्रामध्ये सहकाराची चळवळ सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कामर करणारी सहकार भारती या संस्थेने महाराष्ट्र राज्यभर सहकार चळवळी निस्वार्थ बुद्धीने केलेल्या कामाची पावती म्हणून सहकार महर्षी या पुरस्काराची सहकार तपस्वी कै. तात्यासाहेब देशमुख यांच्या कार्याची दखल घेऊन सहकार महर्षी या ग्रंथात स्थान दिल्यामुळे पुढील पिढीस संस्थेस निस्वार्थी बुद्धीने काम केलेची आठवण कायम राहील.

श्री भगवंत प्रसन्न



दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



प्रोप्रा. रमेश (बापू) माने
ए क्लास गव्ह. लायसन्स इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर
मो. 7769098777

हेमंत इलेक्ट्रिकल्स, बार्शी (M.C. No. 18421)

Specialist In : H.T. / L. T. Line Work & Material Suppliers ▪ Cable Work ▪ S. V. Lights ▪ S/stn Work ▪ Domestic & Industrial Wiring ▪ Panel Work ▪ Transformer Repair ▪ 33/12/11 RV HT Cable Jointing Kit

ऑफीस : तुळशीराम रोड, सांगली बँकेजवळ, बार्शी, जि. सोलापूर

मे. श्री. येडेश्वरी इलेक्ट्रिकल्स अॅन्ड इंजिनिअर्स बार्शी (M.C. No. 37637)

श्री भगवंत सुशिक्षित बेरोजगारांची स्वयंरोजगार सेवा व उद्योग सहकारी संस्था मर्यादित, बार्शी.

दै. तरुणभारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !

तिरुपती अॅग्रो एजन्सीज

मंगेश बागूल 9822818524
शिवाजी खळदकर 9850502613
सचिन चव्हाण - 9970693011

नामांकित कंपनीचे भाजीपाला बियाणे, धना मेथी, पालक बियाणे तसेच, मल्चिंग पेपर, क्रॉपकवर, कोकोपिट, ट्रे आणि नामांकित कंपनीचे दर्जेदार औषधे इत्यादीसाठी बार्शीतील १२ वर्षापासुन शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले कृषी दालन

शाखा नं. १ : गाळा नं. २८, मार्केट यार्ड शॉपिंग सेंटर, तुळजापूर रोड, बार्शी, जि. सोलापूर
शाखा नं. २ : एच. पी. पेट्रोल पंपा शेजारी, करमाळा रोड, परंडा, जि. धाराशिव

॥ श्री ॥
Sachin OFFSET
योग्य दर... आकर्षक क्वालिटी
सचिन ऑफसेट
13x19 कलर प्रिंटींग



सर्व प्रकारची छपाईची कामे एकाच ठिकाणी
▸ लग्न पत्रिका
▸ प्लेक्स प्रिंटींग
▸ फोर कलर प्रिंटींग
प्रोप्रा : सचिन आजबे 9881796486 9518701229
वसुंधरा हॉटेलसमोर, जुन्या पोलीस स्टेशनशेजारी, बार्शी

मा. सभापती शिक्षण मंडळ, बार्शी.



दै. तरुण भारत वर्धापनदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा!
रजि. नं. MAH/4402/2007
अॅड. महेश अशोक जगताप
B.Sc., LL.B.
मा. नगरसेवक, बार्शी नगरपालिका
मा. अॅड. महेश जगताप मित्रमंडळ, बार्शी.

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !




सुविधा मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल, बार्शी
कॅन्सर विभाग सुरू
कॅन्सर सर्जरी ▸ जनरल सर्जरी ▸ किमोथेरपी
महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध
मातोश्री कॉम्प्लेक्स, बँक ऑफ इंडियाच्यावर, ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी 413411
+91 (9146523000) | Off : (02184-223600), Off : (8007161010)
24/7 Emergency Service

दै. तरुण भारत वर्धापनदिना निमित्त हार्दिक शुभेच्छा!



करण बारंगुळे
Mo.9623200525
7068651212
फॅमिलीसाठी स्वतंत्र व्यवस्था
अदयावत आरामदायी व प्रशस्त बैठक व्यवस्था
अदयावत झोपडी (हट) प्रशस्त बैठक व्यवस्था
स्वतंत्र ए.सी. हॉल. प्रशस्त बैठक व्यवस्था
हॉटेल वैशाली
▪ नविन मॅनेजमेंट व्यवस्थेसह
▪ परमीट रुम, बिअर बार,
▪ व्हेज नॉनव्हेज जेवण,
▪ अद्ययावत साऊंड सिस्टीमसह प्रोजेक्टर,
▪ फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था
बार्शी शहरापासून जवळच....
परमीट रुम & बिअर बार
बार्शी-कुर्डूवाडी रोडवर
(बार्शी पासून ३ कि.मी.अंतरावर)



दै. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!



अॅड. राहुल अरुण देशमुख
बी.ए. (ऑ.) एल.एल.बी.
सल्लागार, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-बार्शी
सल्लागार, सोलापूर जनता सहकारी बँक लि., शाखा-बार्शी

फर्म :
श्री रेणुका उद्योग, बार्शी.
श्री रेणुका कॉम्प्लेक्स
श्री रेणुका अॅग्री फर्म
मो. ९४२२३९६१११, ८८३०५९९८३१
अलिपूर रोड, बार्शी, जि. सोलापूर

# बार्शीतील श्री भगवंत मल्टीस्टेटची यशस्वी वाटचाल...!

बार्शीतील आय.एस.ओ. मानांकन प्राप्त असलेली श्री भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप. सोसायटीची स्थापना २१ एप्रिल २०१५ रोजी झाली. संस्थेचे चेअरमन श्री. संतोष ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या बँकेच्या ४ शाखा सुस्थितीत चालू असून बँकेची १०० कोटी ठेवीकडेही वाटचाल सुरु असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींद कांबळे यांनी सांगितले.डॉ. विठ्ठल लहाने, मोहन जोशी, नितीन बानगुडे पाटील, सचिन पिळगावकर, समीरा गुजर जोशी, उपजिल्हाधिकारी सौ. अंजली धानोरकर इत्यादी नामांकित व्यक्तींनी व्याख्यानमालेत प्रबोधन केले आहे.

संस्थेच्या बार्शी, पांगरी, वैराग व परांडा या चार शाखांत मिळून ९२ कोटी ठेवी असून ७३ कोटी कर्ज वाटप, २६ कोटी गुंतवणूक आणि ४.८ कोटी खेळते भांडवल आजरोजी आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या युगात सहकारी संस्था टिकवून ठेवणे सोपी गोष्ट नाही. संस्थेचा विस्तार वाढवत असतानाच संस्थेतर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. बार्शीतील ग्रामदैवत श्री भगवंत प्रकट दिन उत्सवानिमित्त सामाजिक संदेश देणारे विविध व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. या व्याख्यान मालिकेत आतापर्यंत स्व. सिंधुताई संकपाळ, श्याम मानव, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भारुड, उद्योगपती हनुमंतराव गायकवाड, डॉ. विठ्ठल लहाने, मोहन जोशी, डॉ. सदानंद मोरे, नाना पाटेकर,



नितीन बानगुडे पाटील, सचिन पिळगावकर, समीरा गुजर जोशी, उपजिल्हाधिकारी सौ. अंजली धानोरकर इत्यादी नामांकित व्यक्तींनी व्याख्यानमालेत प्रबोधन केले आहे.

सध्या संस्थेच्या बार्शी, पांगरी, वैराग, परांडा इत्यादी शाखेतून दैनंदिन कामकाज सुस्थितीत सुरु आहे. अनेक नव उद्योजकांना कर्ज वाटप करुन त्यांना सक्षम करण्यात हातभार लावला आहे. सर्व सभासदांना व ग्राहकांसाठी एसएमएस सुविधा, आरटीजीएस, एनईएफटी सुविधा एटीएम सुविधा, पिग्मी ग्राहकांसाठी विनामूल्य एसएमएस सुविधा व तत्काळ कर्जाची सोय असल्यामुळे अल्पावधीतच आमची मल्टीस्टेट नावारुपाला आली. सुरुवातीला १ कोटी ५ लाखांच्या भाग भांडवलावर संस्था सुरु केली. तसेच कोविडच्या महामारीमुळे अनेकांचे काम गेले. व्यवसाय व उद्योगधंदे बंद पडले. अशा सभासद, ग्राहकांना पाठीवर हात देवून व पुन्हा प्रोत्साहन देवून, पुन्हा भांडवल देवून त्याना उभे राहण्याचे काम हे सोसायटीने केले आहे. संस्थेकडून बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी भांडवल उत्पन्न करुन देण्यासाठी संस्थेकडून अल्प मुदत कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कर्जाच्या हप्त्याची सुविधा दैनंदिन पिग्मीच्या माध्यमातून भरुन ग्राहक कर्जाची परतफेड करु शकतो.

आजपर्यंत सोसायटीने उल्लेखनीय काम केल्यामुळे सहकार क्षेत्रातील अनेक संस्थांनी व बँकांनी विविध पुरस्काराने गौरव केला आहे. यामध्ये सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार तसेच बँकोचा पुरस्कार, सहकार फेडरेशनचा सहकार गौरव सोहळा २०२२ चा पुरस्कार, शिवशक्ती अर्बन को-ऑप. बँक यांचा आदर्श संस्था पुरस्कार व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या शाहीर अमर शेख राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सन २०२३ असे पुरस्कार या सोसायटीला संपन्न झाले आहेत. याचे सर्व श्रेय हे आमचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व सोसायटीचे असणारे सर्व कर्मचारी वृंद व संचालक यांना जाते.

सेंट्रल रजिस्ट्रार यांच्याकडे प्रस्ताव पाठवून नवीन ७ शाखांना मंजुरी प्राप्त करुन घेतली. शाखा पंढरपूर, धाराशिव, तुळजापूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई व विजापूर या ठिकाणी मंजुरी मिळाली आहे. सर्व सभासदांच्या सेवेसाठी आम्ही सोने तारण कर्ज ही सुविधा चालू केली आहे. या पुढेही सामाजिक बांधिलकी म्हणून श्री भगवंत मल्टीस्टेटकडून बार्शीसह सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील सर्व स्तरावरील लोकांना सोबत घेवून एक नवी उंची गाठण्याचा प्रयत्न करीत राहणार आहेत, असे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलींद कांबळे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.


दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

ठेवी 91 कोटी

अल्पावधीतच विश्वासास पात्र ठरलेली संस्था...

Reg. No. MSCS/CR/1188/2015

ISO 9001:2015
प्रमाणित जिल्ह्यातील पहिली मल्टीस्टेट

IFSC CODE : ICIC0000104

पिग्मी ठेव ग्राहकांसाठी दैनंदिन शिल्लक रकमेची SMS सेवा देणारी एकमेव संस्था

नवीन शाखा मंजूरी :
मुंबई, पुणे, छ.संभाजीनगर, पंढरपूर, धाराशिव, तुळजापूर, विजापूर

ठेवींवर आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| १ ते ३ महिने | 7% |
| ३ महिने ते ६ महिने | 8% |
| ६ महिने ते १२ महिने | 9% |
| १३ महिने ते २ वर्ष | 10% |
| २ वर्षापुढे | 11% |
| ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिक इ. | 1% |
| आवर्तक ठेव (१ वर्ष) | 10% |
| सेव्हींग्ज ठेव | 4% |

दामदुप्पट ठेव ७२ महिने

One Stop Banking, Non-stop Service

# श्री भगवंत मल्टीस्टेट
## क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी.

मुख्य कार्यालय : निकीता हॉटेल शेजारी, कुर्डूवाडी रोड, पाटील प्लॉट, बार्शी.
Mob.08805375959, E-mail: sbmbarshi@gmail.com

मुख्य शाखा : बार्शी Mob. 9881926296 | पांगरी Mob. 8380805959 | वैराग Mob. 8805325959 | परांडा Mob. 9552065959

संचालक मंडळ

श्री. संतोष रावसाहेब ठोंबरे — चेअरमन

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. शहाजी हरिदास फुरडे-पाटील | व्हा.चेअरमन | प्रा. सतिश दिनकरराव देवकर | संचालक |
| श्री. प्रदीप सुभाष औसेकर | सचिव | श्री. आबासाहेब विष्णू लोंढे | संचालक |
| श्री. विलास कृष्णा निंबाळकर | संचालक | सौ. माधुरी संतोष ठोंबरे | संचालिका |
| सौ. सविता अविनाश सोलवट | संचालिका | श्री. मिलिंद सिद्राम कांबळे | मुख्य कार्यकारी अधिकारी |

उपलब्ध सुविधा
* मासिक व्याज प्राप्ती योजना
* एस.एम.एस. बँकिंग सुविधा
* सर्व प्रकारचे तारण कर्ज
* RTGS & NEFT सुविधा.
* QR CODE सुविधा.

Sachin Offset



बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी संचलित खालील शाखांतर्फे
दै. सोलापूर तरुण भारतच्या
४१ व्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !

१) सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, बार्शी.
२) नवीन मराठी शाळा, बार्शी.
३) श्रीमती मंगलाताई सुलाखे शिशुविहार, बार्शी.
४) सुलाखे इंग्लिश मिडियम स्कूल, बार्शी.
५) सुलाखे इंग्लिश मिडीयम प्री प्रायमरी स्कूल, बार्शी.
६) सुलाखे कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बार्शी.
७) सुलाखे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, बार्शी.

* शुभेच्छुक *
बार्शी एज्युकेशन सोसायटी बार्शीचे - अध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त, सर्व मुख्याध्यापक
सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर वृंद



# नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी



कै.सौ. सर्वमंगलाबाई उत्तरेश्वर कथले
संस्थापक चेअरमन
कै. डॉ. बी.एम. नेने

कॅन्सर निदान व उपचार एकाच छताखाली उपलब्ध

महात्मा ज्योतीराव फुले जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत केसरी व पिवळे रेशनकार्ड धारकांना सर्व प्रकारच्या कॅन्सरसाठीचे उपचार (ऑपरेशन/केमोथेरपी/रेडीओथेरेपी) मोफत मिळतील.

सन १९८१ पासुन
कॅन्सरवरील जागतिक पातळीवरील संशोधन (WHO/IARC) व उपचारासाठी अग्रणी संस्था म्हणून देश-विदेशांत सुपरिचीत टाटा मेमोरियल सेंटर मुंबई मान्यता प्राप्त ग्रामीण कर्करोग प्रकल्प केंद्र

उपलब्ध सुविधा
• सीटी स्कॅन • सोनोग्राफी • मॅमोग्राफी • डिजीटल एक्स-रे
निदान चाचणीसाठीच्या अद्यावत प्रयोगशाळा,
तज्ञ डॉक्टर्स व कुशल मनुष्यबळ
24x7 वैद्यकीय सेवा उपलब्ध
धर्मदाय रुग्ण निधी (I.P.F.) अंतर्गत निर्धन व अर्थिक दृष्ट्यादुर्बल घटकातील रुग्णांना मोफत अथवा ५०% सवलतीच्या दरात उपचाराची सुविधा उपलब्ध

तज्ञ व अनुभवी डॉक्टर्स

सर्जिकल ऑंकोलॉजी
• डॉ. प्रकाश डाळे
• डॉ. अनंत माने
• डॉ. विनीत बिराजदार
• डॉ. भालचंद्र कश्यपी

फिजीशियन
• डॉ. योगेश सोमाणी
• डॉ. स्नेहल माढेकर
• डॉ. रविंद्र पुनमिया

मेडीकल ऑंकोलॉजी
• डॉ. एच.एस. गडदे
• डॉ. अमित इनामदार
• डॉ. आर. राजेश्वरकर

पॅथॉलॉजिस्ट
• डॉ. अशोक कोठारी
• डॉ. गौरव साखरे
• डॉ. संगिता मोहिते (Oncopathologist)

रेडिएशन ऑंकोलॉजी
• डॉ. एच.एस. गडदे
• डॉ. आर. राजेश्वरकर

रेडीओलॉजिस्ट
• डॉ. राघवेंद्र अणवेकर
• डॉ. स्नेहा सोळंकी

न्यूक्लीयर मेडिसीन
• डॉ. आर. राजेश्वरकर

भुलतज्ञ
• डॉ. वर्षा माने

Sachin Offset



पेट स्कॅन सुविधा उपलब्ध



अत्याधुनिक रेडिएशन उपचार
3DCRT,IMRT, VMAT उपलब्ध

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती प्रभावती झाडबुके | ॲड. आमदार दिलीप सोपल | श्री. सत्यनारायण झंवर | श्री. बन्सीधर शुक्ला |
| अध्यक्षा | चेअरमन व कार्याध्यक्ष | सचिव | खजिनदार |

* समस्त संचालक मंडळ *

किशोर परांजपे — प्रशासकीय अधिकारी
डॉ. सुखदा कुलकर्णी — वैद्यकीय अधिक्षक

डॉ. बी.एम. नेने अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च ॲण्ड रिलीफ सोसायटी,
सौ. एस.यु. कथले चॅरिटेबल ट्रस्ट, श्री. नवलमल फिरोदीया मेमोरियल लिनीयर ॲक्सीलेटर ॲण्ड डायग्नोस्टिक सेंटर
पत्ता : आगळगांव रोड, बार्शी, जि. सोलापूर संपर्क : ०२१८४-२२२६९९
• Web site : www.ndmchbarshi.org • Email : ashwinisociety@gmail.com



दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल...!



सभासद व ग्राहकांच्या विश्वासाला जपणारी पतसंस्था

# श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, बार्शी.

२६३२, रुई ओळ, बार्शी, जि. सोलापूर

ठेवीचे व्याज दर

| | |
|---|---|
| * ४६ दिवस ते ९० दिवस | ४% |
| * ९१ दिवस ते ३६४ दिवस | ६% |
| * १ वर्ष ते २ वर्षाचे आत | ९% |
| * २ वर्षे ते ५ वर्षे | ९.५% |

* (ज्येष्ठ नागरिक १ वर्षाचे पुढे अर्धा टक्का जादा)
* मासिक मुदत ठेव किमान ३ वर्षे
* बचत रोखा (दामदुप्पट) ८४ महिने

कर्जाचे दर
* सोनेतारण कर्ज १४%
* इतर कर्जे १५%
* ठेव तारण कर्जे तारण ठेव व्याजदरापेक्षा २% जादा

* वैशिष्ट्ये :-
* विविध प्रकारच्या कर्ज योजना.
* लॉकरची सोय.
* सोने तारण / वेअरहाऊस तारण त्वरीत उपलब्ध.
* संपूर्ण संगणकीकृत कामकाज.
* विनम्र व तत्पर सेवा.

* संचालक मंडळ *

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. श्री. बी. वाय. यादव (अध्यक्ष) | ॲड. श्री. अ.अ. तांबोळी (उपाध्यक्ष) | | श्री. गो. म. लोहे (संचालक) |
| श्री. भा. वि. बडवे (संचालक) | श्री. स. पां. राऊत (संचालक) | श्री. नं. ना. देशमुख (संचालक) | श्री. भा.द. नाईकवाडी (संचालक) |
| श्री.डॉ. कृ.द. मस्तुद (संचालक) | श्री. सु. बा. खाडे (संचालक) | श्रीमती वै.वि. टिळक (संचालिका) | श्री. अ. रा. बनसोडे (सरव्यवस्थापक) |

सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद







## भारतीय शौर्य पुन्हा एकदा उजेडात आणू या, चला

# 'विजय दिवस साजरा करूया !

आपल्या दैदीप्यमान पराक्रमी इतिहासाच्या जोरावर प्रखर राष्ट्रभक्तीने जगभरात भारतीय संस्कृतीची अटल छाप सोडणाऱ्या माझ्या भारतीय बांधवांना 'विजय दिवसाच्या' हार्दिक ' शुभेच्छा ! आजच्याच २६ जुलै १९९९ या दिवशी तत्कालीन पंतप्रधान श्रद्धेय दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात कारगिल मध्ये पाकिस्तानला युद्धात पराजित करून 'भारतीय शुर सैनिकांनी ऑपरेशन विजय' यशस्वी केले. तब्बल १८ हजार फूट उंचीवर भारतीय सैन्याने आपले शौर्य जगाला दाखवले होते. एवढ्या उंचीवर आणि उणे ४० अंश सेल्सिअस तापमानात लढले गेलेले हे युद्ध जगातील एकमेव उदाहरण म्हणावे लागेल. हा भारतीयांच्या शौर्याचा अगदी अलिकडचा पराक्रम आहे. पण गेल्या ३ तीन हजार वर्षात भारतीय वीर भूमिपुत्रांनी आणि योध्यानी असाच शौर्याचा इतिहास रचला,पण तो इतिहास आजच्या पिढी पर्यंत ज्या प्रखरतेने पोहोचायला पाहिजे त्या प्रखरतेने आतापर्यंत पोहोचला नाही, याची मला खंत आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी आणि विजय दिवसाचे औचित्य साधत माझ्या कौशल्य विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्यातल्या सर्व शासकीय आणि खाजगी मिळून एक हजार व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण केंद्रात भारतीय विजयाची गाथा विद्यार्थ्यांपुढे मांडण्याचा उपक्रम आम्ही सुरू केला. ऐतिहासिक लढाया, पराक्रमी राजे, योध्ये यांचे पोस्टर प्रदर्शन, त्याअनुषंगाने काव्य, निबंध स्पर्धा, माजी सैनिकांचे वीरगाथे संदर्भात व्याख्यान, वीरमाता, वीर पत्नी यांचा सन्मान आणि शहिदांना नमन या कार्यक्रमांनी भारतीय पराक्रमाला विविध संस्थांमध्ये उजाळा देण्यात येणार आहे.




मंगलप्रभात लोढा

कौशल्य, रोजगार व नाविन्यता मंत्री,महाराष्ट्र राज्य


**फभारतीय भूमिपुत्र राजे,योध्ये यांचे शौर्य**

भारतीय शूरवीर पराक्रमी राजांचे शौर्य विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवून प्रखर राष्ट्रभक्तीची प्रेरणा नव्याने जागृत करावी या उद्देशाने लोणावळा येथील क्रांतिकारक लहुजी साळवे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांगरगाव येथे विजय दिवसाचे पाहिले पुष्प वाहण्यात आले. भारतीय महापराक्रमी राजांनी आणि भारतमातेच्या शुर रण रागिणीनींनी परकीय आक्रमण परतवून लावताना दाखवलेल्या शौर्याची गाथा राज्यभरातल्या संस्थांमध्ये सांगितली जाणार आहे. भारतीय इतिहास साक्ष देतो की, भारतभूमीवर आलेल्या प्रत्येक परकीय आक्रमकास भारतीय धैर्याने आणि पराक्रमाने सामोरे गेले. अलेक्झांडरशी लढणारा राजा पुरू, इस्लामी आक्रमकांविरुद्ध उभे ठाकलेले महाराजा सुहेलदेव, अकबराला धूळ चारणारी राणी दुर्गावती, महाराणा प्रताप ज्यांनी मेवाडच्या प्रत्येक कणाकणात स्वातंत्र्याची शपथ रुजवली, छत्रपती शिवाजी महाराज ज्यांनी हिंदवी स्वराज्याची ज्योत पेटवली, आणि पृथ्वीराज चौहान ज्यांनी शत्रूंना वेळोवेळी पराभवाची धूळ चारली. दुर्दैवाने, हा इतका गौरवशाली विजयाचा इतिहास काही काळ राजकीय स्वार्थाच्या धुसर पडद्याआड लपला. या पराक्रमाचे सखोल चित्रण भारतीयांच्या पुढे आले नाही हे आपले दुर्दैव. मात्र आता हे चित्र बदलण्याची वेळ आली आहे. नव्या पिढीला आपल्या राष्ट्राच्या शौर्यगाथांचा अभिमान बाळगता यावा, त्यांच्या नसानसांत भारतीयत्व आणि पराक्रमाची ज्योत पेटावी यासाठी विजय दिनाचा उत्सव साजरा करणे अत्यावश्यक आहे. पराक्रमी राजांनी भारताच्या दैदिप्यमान विजयगाथेत सोनेरी पाने भरली. हीच सोनेरी पाने पुन्हा एकदा ऊर्जेने ओतप्रोत भरलेल्या तरुणांसमोर उलगडली जाणार आहेत.

**स्वातंत्र्यानंतरही भारताची विजयाची परंपरा**

ज्याप्रमाणे आपल्या भूमिपुत्र राजांनी परकीय आक्रमणाच्या विरोधात पराक्रमाची ज्योत तेवत ठेवली त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतरही भारतीय सैन्याने शत्रू राष्ट्रांवर विजय मिळवला. पाकिस्तानविरुद्ध १९४८ मध्ये पहिले युद्ध, १९६५ चे युद्ध, १९७१ चे युद्ध ज्यामध्ये बांगलादेशाची मुक्तता झाली. या प्रत्येक लढ्यात भारतीय सैन्याने प्राणांची आहुती देत भारतीयांची छाती गौरवाने फ ुलवली. अलीकडील पाकिस्तान पुरस्कृत उरी हल्ल्यानंतर पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय सैनिकांनी केलेला सर्जिकल स्ट्राईक, बालाकोट एअर स्ट्राईक आणि 'ऑपरेशन बंधन' सारख्या म ोहिमांनी भारताची दहशतवादाविरुद्धची कठोर भूमिका जगाला दाखवून दिली. नुकतेच पहलगामच्या भ्याड हल्यानंतर 'ऑपरेशन सिंदुर' ने दिलेले जशाच तसे उत्तर हा नव्या भारताचा आक्रमक पवित्रा संपूर्ण जगाने पहिला.

भारतीय संस्कृतीत विजय ही केवळ ऐतिहासिक घटना नाही, ती आपल्या जीवनमूल्यांचा, परंपरांचा आणि राष्ट्राभिमानाचा गाभा आहे. विजय दिवस हा उत्सव शौर्य, बलिदान आणि स्वराज्याची प्रेरणा देणारी ऊर्जा आहे. चला प्रखर राष्ट्रभक्तीच्या भावनेने शौर्याला मनोभावे वंदन करुया!

**जय हिंद!वंदे मातरम!**

---

**प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सोलापुरशी अतुट ऋणानुबंध होता. शहर - जिल्ह्याला अनेकवेळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पदस्पर्श लाभला. भारतरत्न डॉ. आंबेडकर ज्या-ज्या वेळी सोलापुरला आले त्यावेळी झालेल्या परिषदा, मानपत्र सोहळा, भाषणे या सर्व क्रांतीकारक घटना सोलापूरकरांसाठी स्फूर्तीदायी ठरल्या. तुमच्या मताची किंमत मिठ-मिरची, सारखी समजू नका !, स्वतःच्या पायावर उभे राहून सर्वांगीण उन्नती करा !!, असा प्रेरक संदेश त्यांनी दिला.**



# विश्वभूषण डॉ. आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतीप्रवण झाली सोलापूर नगरी !

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनेकवेळा सोलापूर जिल्ह्यात आले. त्या दरम्यान साधारणतः १४ विविध कार्यक्रम पार पडले. १ जानेवारी १९२५ मध्ये बहिष्कृत हितकारणी सभेने डॉ. आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मिलिंद नगरात पहिल्या वसतिगृहाची स्थापना केली होती. बार्शी येथे देशांतर - नामांतर की धर्मांतर १ मे १९२४ मध्ये बार्शी येथे मुंबई प्रांतिक बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने परिषद झाली. या परिषदेत देशांतर-नामांतर की धर्मातर यावर महत्त्वपूर्ण भाष्य करीत धर्मांतराचा संकल्प आंबेडकर यांनी बार्शी येथे केला. धर्मांतराबाबतचे चिंतन त्यांनी व्यक्त केले होते.

दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी सोलापूर शहरात थोरला राजवाडा (मिलिंद नगर) येथे सोलापूर जिल्हा महार वतनदार परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. यावेळी डॉ. बाबासाहेब उपस्थित होते. स्वतःच्या पायावर उभे राहून सर्वांगीण उन्नती करा, स्वतंत्र व्हा, स्वतंत्र वसाहती निर्माण करुन निर्भयपणे जगण्याचा मंत्र त्यांनी यावेळी दिला. या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे धर्मांतराचा ठरावही केला होता. ६ मार्च १९३२ रोजी सोलापूररेल्वे स्टेशन येथे स्पृश्य व अस्पृश्य मंडळींसमोर डॉ. आंबेडकर यांचे प्रेरणादायी भाषण झाले होते. भारतीय गोलमेज परिषदेच्या मतदार कमिटीची स्पेशल गाडी सोलापूर स्टेशनवर आल्यानंतर स्टेशन बाहेर जमलेल्या जनसमुदायाच्या आग्रहास्तव बाहेर येऊन त्यांनी मार्गदर्शन केले होते.




किरण बनसोडे

सोलापूर

९८२२६१६१५१


करकंब येथे ३१ डिसेंबर १९३७ रोजी मातंग समाजापुढे भाषण झाले. जातीभेद ही वरुन वाहत आलेली गटारगंगा असल्याचे त्यांनी सांगितले. पंढरपूर येथे ३१ डिसेंबर १९३७ रोजी जिल्हा राजकीय परिषद झाली. त्यात त्यांनी जुलूमांविरुद्ध प्रतिकार करण्याचा संदेश दिला. निर्भय होण्याचे आवाहन केले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते दि. २४ एप्रिल १९३७ रोजी या ऐतिहासिक विहिरीचे उद्घाटन करण्यात आले होते. डॉ. आंबेडकरांनी चांदीच्या ग्लासामधून पाणी वर काढून या विहिरीचे उद्घाटन केले होते. सोलापुरातील धाकटा राजवाडा येथेही त्यांनी भेट दिली होती.

त्यानंतर आंबेडकर हे १ जानेवारी १९३८ रोजी सोलापुरात आले होते. नव्या वर्षाच्या दिवशीच सोलापुरात त्यांनी हिंदी ख्रिस्ती समाजाला मागदर्शन केले होते. सोलापूर नगरपालिकेच्या वतीने डॉ. आंबेडकरांना मानपत्र प्रदान करण्यात आले होते.

दरम्यान, कसबे - तडवळे (ढोकी) येथे २३ फेब्रुवारी १९४१ रोजी वतनदार महार-मांग परिषदे डॉ. बाबासाहेब उपस्थित होते. काँग्रेसपासून सावध रहा, असे आवाहन करतानाच त्यांनी त्यावेळी आपला संसार आपणच केला पाहिजे. सन्मानाने जगण्यासाठी राजकीय हक्काची सत्ता आपल्या हाती पाहिजे, असा मूलमंत्र दिला होता.

सोलापूर शहरात नगरपालिकेच्या वतीने दोनवेळा आणि अस्पृश्य जनतेतर्फे एकदा असे तीन वेळा डॉ.बाबासाहेबांना धाटात मानपत्र अर्पण करण्यात आले होते. सोलापुरात थोरला राजवाडा येथे २४ मे १९३२ रोजी तत्कालिन अस्पृश्य जनतेच्या वतीने प्रथमच डॉ. बाबासाहेबांना मनोभावे मानपत्र प्रदान करण्यात आले. बेंच मॅजिस्ट्रेट पापय्या बाबाजी बेलपवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. भागवत चित्र मंदिर येथे १ जानेवारी १९३८ रोजी नगरपालिकेच्या वतीने रावबहादूर डॉ. व्ही. व्ही मुळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. हरिभाई देवकरण हायस्कूलच्या कै. रा.ब. मुळे स्मारक मंदिरात दि. १४ जानेवारी १९४६ रोजी जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना मानपत्र अर्पण करण्यात आले.

**सोलापुरात थोरला राजवाडा येथे तीन वेळा लाभली डॉ. आंबेडकरांची भेट**

**सोलापुरात थोरला राजवाडा येथे तीन वेळा डॉ. आंबेडकरांची भेट लाभली.**

दि. २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी सोलापूर शहरात थोरला राजवाडा (मिलिंद नगर) येथे सोलापूर जिल्हा महार वतनदार परिषदेचे दुसऱ्या अधिवेशनासाठी डॉ. आंबेडकर आले होते. २४ मे १९३२ रोजी तत्कालिन अस्पृश्य जनतेच्या वतीने प्रथमच डॉ. बाबासाहेबांना मनोभावे मानपत्र प्रदान करण्यात आले. त्यानंतर २४ जानेवारी १९३७ रोजी मुंबई लेजिस्लेटीव्ह असेम्ब्ली निवडणुकी निमित्त डॉ. आंबेडकर सोलापुरात आले होते. थोरला राजवाडा येथील मंडपात त्यांचे भाषण झाले.



**आंबेडकर यांचा बावी येथे मुक्काम**

जानेवारी १९२५ मध्ये माता रमाई यांची प्रकृती खालावली होती. हवा पालट म्हणून तेव्हा डॉ. बाबासाहेब सहकुटुंब माढा तालुक्यातील बावी येथे मुक्कामी आले होते. समाज सुधारक वालचंद कोठारी यांच्या मळ्यात ते काही दिवस राहिले होते.

**सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ सोलापुरात रोवली**

हरिमाई देवकरण हायस्कूलच्या कै. रा. ब. मुळे स्मारक मंदिरात दिनांक १४ जानेवारी १९४६ रोजी जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना मानपत्र अर्पण करण्यात आले. सार्वजनिक कार्याची मुहुर्तमेढ सोलापूरात मी रोवली, असे डॉ. आंबेडकरांनी त्यावेळी अभिमानाने सांगितले. मजूरमंत्री या नात्याने मजुरांच्या हिताकडे अधिक लक्ष देत आहे. मजुरांच्या हिताचे १० कायदे करीत आहोत, ज्याम ुळे देशाचे सामाजिक व आर्थिक दारिद्रय दूर करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले. बडबड करण्यापेक्षा कृतीला महत्त्व असल्याचे प्रेरणादायी विचार त्यांनी मांडले.

**तुमच्या मताची किंमत मिठ-मिरची सारखी समजू नका !**

२४ जानेवारी १९३७ रोजी मुंबई लेजिस्लेटीव्ह असेम्ब्ली निवडणुकी निमित्त डॉ. आंबेडकर सोलापुरात आले होते. थोरला राजवाडा येथील मंडपात त्यांचे भाषण झाले. तुमच्या मताची किंमत मिठ-मिरची, सारखी समजू नका, तुमच्या प्राणा इतकीच किंबहुना त्याहुन जास्त तुमच्या मताची किंमत आहे, हे विसरु नका, असे मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले होते.

---

**सांगोला तालुक्यातील सोनंद नगरीमध्ये ग्रामदैवत श्री सिद्धनाथ काळभैरव हे देवस्थान आहे. सदर देवस्थान श्री सिद्धनाथ देवस्थान श्री क्षेत्र सोनारी, ता.परंडा येथील ठाणके असून जागरूक देवस्थान आहे. हे अंदाजे २०० ते २५० वर्षापूर्वीचे प्राचीन हेमाडपंथी मंदिर अस्तित्वात होते. त्याचे साक्षी देणारे पुरावे तेथील असणारी दगडी डिकमल व इतर अन्य बांधकामे अस्तित्वात आहे.**

# आध्यात्मिक वारसा, संत महंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली सोनंद नगरी

मोठ्या श्रद्धेने व भावनेने भक्तगण येतात व श्रद्धेने दान, अन्नदान करतात. मंदिराचा जिर्णोद्धार करून सन २000 ला मंदिर, शिखर तसेच सभामंडप बांधकाम करण्यात आले. सोनंद मधील सर्व ग्रामस्थांचे ते ग्रामदैवत असून हनुमान जन्मोत्सव चैत्र पौर्णिमा या दिवशी श्री सिद्धनाथ व जोगेश्वरी माता यांचा विवाह सोहळा मोठ्या उत्साहामध्ये साजरा होत असतो. या विवाह सोहळ्यास हजारोच्या संख्येने भक्तगण उपस्थित असतात. देवस्थान ट्रस्ट यांचे माध्यमातून भक्त यांच्या निवासासाठी भक्तनिवास बांधण्यात आलेले आहे. तसेच वर्षभर प्रत्येक पौर्णिमेला महाआरती व महाप्रसाद यांचे आयोजन करण्यात येते. देवस्थानच्या विकासासाठी श्री सिद्धनाथ काळभैरव देवस्थान ट्रस्ट यांचे माध्यमातून तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात येत असून लवकरच त्या संबंधाने पाठपुरावा केला जात आहे. तसेच मंदिर परिसरामध्ये आई तुळजाभवानी देवीचे ही मंदिर आहे. नवरात्र मध्ये मोठ्या उत्साहामध्ये या ठिकाणी कार्यक्रम होतात.




तात्यासाहेब देशमुख

सांगोला

९५६१२८९४७५


सोनंद नगरी निळकंठ महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले असून राम मंदिर, दत्त मंदिर, हनुमान मंदिर, गणेश मंदिर अशी पवित्र देवस्थाने एकाच ठिकाणी पाहावयास मिळतात. तसेच पानिपत मध्ये वीरमरण आलेले शिदोजी महाराज यांचे समाधी स्थळ आहे. गावाच्या पश्चिमेला श्री सद्गुरु सय्यदबाबा यांचे समाधी स्थळ आहे. मोठ्या श्रद्धेने राज्यातून विविध भागांमधून भक्त येत असतात. रामनवमी या दिवशी मोठी यात्रा भरवण्यात येते. श्री गोपीनाथ बाबा यांची समाधीस्थळ ही या ठिकाणी आहे. श्रद्धा आणि सबुरी या भावनेने भक्तगण देवस्थानास भेट देऊन कृपाशीर्वाद घेतात. तसेच दख्खनचा राजा जोतिबा यांचेही मंदिर असून चैत्र महिन्यामध्ये मोठ्या उत्साहामध्ये यात्रा सोहळा साजरा केला जातो. या निमित्ताने पालखीची भव्य मिरवणूक काढली जाते. गावाच्या पश्चिमेला श्री सिद्धनाथ खरसुंडी मंदिर आहे. सदर ठिकाणी मंदिर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. तसेच मंदिर परिसर सभामंडप सुशोभीकरण करण्याचे काम सुरू आहे. तसेच एकविरा आई यांचे मंदिर हे जिल्ह्यातील एकमेव मंदिर सोनंद नगरीमध्ये असून सदर मंदिराचा ही जीर्णोद्धार करण्याचे काम सुरू आहे. गावच्या दक्षिणेला कोरडा नदीच्या शेजारी श्री सिद्धनाथ शिरनांदगी देवस्थान मंदिर असून मंदिर सभा मंडप जीर्णोद्धार करण्यात येत आहे.






## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन २०२५

# व्याघ्र संवर्धनासाठी जागतिक वचनबद्धता


**सोलापूर जिल्ह्यातील वाघाचा वावर आपण मागील वर्षभरापासून ऐकून आहोत बार्शी तालुका आणि धाराशिव जिल्ह्यातील येडशी जंगल परिसरातील वाघाच वावर त्याची दहशत आपण सर्वांनी पाहिली आहे.मानव आणि वन्य जीव हा संघर्ष नवीन नसेल तरी आज वाढते शहरीकरण जंगलतोड आणि वन्यजीवांच्या अधिवासावर मानवी अतिक्रमण हे या संघर्षाला पूरक ठरत आहे.जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी थोडे अंतर्मुख होऊन याकडे पाहणे गरजेचे आहे. जागतिक व्याघ्र दिन दरवर्षी २९ जुलै रोजी जगभर साजरा केला जातो. २९ जुलै २०१० रोजी रशिया मधील सेंट पीटर्सबर्ग येथे भरलेल्या व्याघ्र परिषदेत हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात आला.दरवर्षी २९ जुलै रोजी वाघ संवर्धनासाठी जागृती करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा केला जातो. अनेक देशांनी वाघ वाचवण्याचे जागतिक ध्येय ठेवले होते. भारतानेही वाघांना वाचवण्यात मोठे योगदान दिले आहे. आज जगात सर्वात जास्त वाघ भारतात आढळतात. भारतात २०२२ व्याघ्र गणनेनुसार, भारतात ३१६७ वाघ आहेत, जे जागतिक संख्येच्या सुमारे ७५ टक्के आहे. भारतात वाघांची सर्वाधिक लोकसंख्या मध्य प्रदेशात आहे. जिथे सध्या ७८५ वाघ आहेत. यानंतर कर्नाटकचा क्रमांक लागतो जिथे वाघांची संख्या ५६३ आहे.**



या यादीत उत्तराखंड चौथ्या स्थानावर आहे जिथे ५६० वाघ आहेत आणि महाराष्ट्र पाचव्या स्थानावर आहे. जिथे ४४४ वाघ आहेत. भारतानंतर रशिया हा वाघांची संख्या असलेला दुसरा देश आहे. येथे फक्त ५४० वाघ आहेत. या संदर्भात मध्य प्रदेश राज्य जगभरातील देशांशी स्पर्धा करत आहे.

या व्याघ्र प्रकल्पांमध्ये वाघांची संख्या जास्त आहे. व्याघ्र प्रकल्पाबद्दल बोलायचे झाले तर उत्तराखंडच्या जिम कॉर्बेटकडे वाघांची संख्या सर्वाधिक आहे. येथे २६० वाघ आहेत. यानंतर बांदीपूर (१५०), नागरहोल (१४१), बांधवगड (१३५), दुधवा (१३५), मुदुमलाई (११४), कान्हा (१०५), काझीरंगा (१०४), सुंदरबन (१०४). १००) ), ताडोबा (९७), सत्यमंगलम (८५), आणि पेंच-एमपी (७७) २०२२ पर्यंत, जागतिक वन्य वाघांची संख्या ४,५०० प्रौढ व्यक्ती इतकी असल्याचा अंदाज होता, ज्यापैकी बहुतेक लोकसंख्ये लहान, एकाकी भागात राहतात. आययूसीएन रेड लिस्टमध्ये ही प्रजाती धोक्यात असलेल्या प्रजाती म्हणून सूचीबद्ध आहे . सध्या भारतात वाघांची संख्या सर्वात जास्त आहे. फक्त एक शतकापूर्वी, १,००,००० हून अधिक वाघ आशियामध्ये फिरत होते. या प्रजातीसम ोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे मानवी वाघ संघर्ष. २०१० पासून अनेक देशांनी त्यांच्या वाघांची संख्या दुप्पट केली आहे, परंतु त्यांच्या बहुतेक वाघांच्या अधिवासाचा नाश केला आहे. यामुळे मानव आणि वाघ यावर असंख्य वाद विवाद झाले आहेत.

वाघांची संख्या घटण्याची प्रमुख कारणे म्हणजे बहुतेक वन्यजीव प्रजातींना असलेले धोके. यामध्ये अधिवास नष्ट करणे, अधिवासाचे विखंडन आणि शिकार यांचा समावेश आहे. उच्च मानवी लोकसंख्या घनता असलेल्या देशांमध्ये अतिक्रमणामुळे वाघ मानव-वन्यजीव संघर्षाचे बळी ठरतात. पश्चिमेकडील पूर्व अनातोलिया प्रदेशापासून पूर्वे कडील अमूर नदीच्या खोऱ्यापर्यंत आणि दक्षिणेकडील हिमालयाच्या पायथ्यापासून ते सुंदा बेटांमधील बालीपर्यंत वाघ मोठ्या प्रमाणात आढळतात. २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून, वाघांची लोकसंख्या




त्यांच्या ऐतिहासिक श्रेणीतील किमान ९३% कमी झाली आहे आणि पश्चिम आणि मध्य आशिया, जावा आणि बाली बेटे आणि आग्नेय आणि दक्षिण आशिया आणि चीनच्या मोठ्या भागातून ती नष्ट झाली आहे. वाघ अजूनही मुक्तपणे फिरत असलेल्या श्रेणीतील जे काही शिल्लक आहे ते विखुरलेले आहे, ते सायबेरियन समशीतोष्ण जंगलांपासून ते भारतीय उपखंडातील उपोष्णकटिबंधीय आणि उष्णकटिबंधीय जंगलांपर्यंत, इंडोचीन आणि एक इंडोनेशियन बेट, सुमात्रा पर्यंत पसरलेले आहे.

वाघांना त्यांच्या भक्ष्यासाठी मोठ्या प्रमाणात निवासस्थानाची आवश्यकता असते. ते प्रदेश स्थापित करतात आणि त्यांची देखभाल करतात परंतु त्यांच्याकडे खूप विस्तृत निवासस्थाने असतात ज्यामध्ये ते फिरतात. निवासस्थानाचा आकार प्रामुख्याने शिकारची संख्या, भौगोलिक क्षेत्र आणि व्यक्तीच्या लिंगावर अवलंबून असतो. भारतात, निवासस्थानांची श्रेणी ५० ते १,००० किमी२ (१९ ते ३८६ चौरस मैल) असल्याचे दिसून येते तर मंचूरियामध्ये ते ५०० ते ४,००० किम ी२ (१९० ते १,५४० चौरस मैल) पर्यंत असते. नेपाळमध्ये, संरक्षित प्रदेश नरांसाठी १९ ते १५१ किमी२ (७.३ ते ५८.३ चौरस मैल) आणि मादींसाठी १० ते ५१ किमी२ (३.९ ते १९.७ चौरस मैल) असल्याचे नोंदवले गेले आहे.मानव-वन्यजीव संघर्ष (क्थ्ड) जगभरात आढळू शकतो आणि अनेक शतकांपासून ही एक जागतिक समस्या आहे. फेलिड संवर्धनात, मानव आणि फेलिड यांच्यातील संघर्ष हा जगभरातील सर्वात तातडीचा प्रश्न बनला आहे. भक्षक असल्याने, फेलिड ही मानव-वन्यजीव संघर्ष निर्माण करणारी सर्वात प्रमुख प्रजाती आहे आणि सामान्यतः मानवी सुरक्षेसाठी आणि पशुधनासाठी (शिकारीद्वारे) धोका मानली जाते.

फेलिड्स त्यांच्या मोठ्या घराच्या श्रेणीमुळे आणि आहाराच्या गरजांमुळे मानवांशी संघर्ष करण्यास विशेषतः प्रवृत्त असतात. लोक जखमी होतात किंवा मारले जातात किंवा शिकार केलेले पशुधन अनेकदा सूडबुद्धीने मारले जातात अशा संघर्षांमध्ये सहभागी फेलिड्स मारले जातात. जगातील ७५% पेक्षा जास्त फेलिड प्रजाती, उदाहरणार्थ कॅराकल, चित्ता, युरेशियन लिंक्स, जग्वार, बिबट्या, सिंह, प्यूमा, हिम बिबट्या आणि वाघ, मानव-फेलिड संघर्षांमुळे प्रभावित होतात .

आपण मानवांनी आपल्या राहणीमानासाठी केलेल्या अधिवासाच्या विनाशामुळे वाघांच्या मोठ्या प्रमाणात विचलनाची संख्या कमी होत आहे. आपण शेतीसाठी किंवा घरे आणि गावे बांधण्यासाठी त्यांचे क्षेत्र नष्ट करत आहोत. आणि यामुळे मानव-वाघ संघर्ष होतात.



आजकाल आपण ऐकतो की वाघांना विष देऊन मारले जात आहे किंवा वाघ मानवी वस्तीच्या भागात फिरत आहेत किंवा गुरेढोरे आणि अगदी माणसांवरही हल्ला करत आहेत. तर, या मानवी वाघ संघर्षांची कारणे काय आहेत?




प्रा. रेश्मा माने

युगंधर फाऊंडेशन, सोलापूर

८७८८१ ३९२२९


मानवी वाघ संघर्षाची मुख्य कारणे कोणती आहेत?

### निवासस्थानाची उपलब्धता


वाघांना जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रजातींची आवश्यकता असते, ज्यामध्ये मुख्य जंगलाचा समावेश असलेल्या उच्च दर्जाच्या अधिवासाचा समावेश आहे. वाघ आणि मानवांमध्ये जागेसाठी स्पर्धा हा संघर्ष निर्माण करणारा मुख्य घटक आहे. जगातील बहुतेक भागात, मानवी लोकसंख्या वाढतच आहे. अशाप्रकारे, मानवी समाजाने भूदृश्यावर वर्चस्व गाजवले आहे आणि मानवी प्रभाव आणि हालचाली शहरांच्या कडेला आणि वन्य अधिवासांच्या पलीकडे जातात. वन्य अधिवासांमध्ये मानवांचा हा घुसखोरी, तसेच काही वन्यजीव प्रजातींचे अधिवास यामुळे मानव-वन्यजीव चकमकींची शक्यता वाढली आहे, ज्यामध्ये मानवांवर वन्यजीवांचे हल्ले देखील समाविष्ट आहेत. जंगलांचा ऱ्हास, विखंडन आणि अधिवास नष्ट होणे हे वाघांच्या अधिवासात आणि वाघांच्या शिकारी अधिवासात घट होण्याशी विसंगत आहे; त्यामुळे वाघांची शिकार कमी होईल आणि वाघ अन्न शोधण्यासाठी गावांम ध्ये येतील. त्यामुळे, वनक्षेत्रात आणि जवळ राहणाऱ्या वाघ आणि मानवांमधील संघर्षाची शक्यता वाढत आहे.




### वन्य शिकार उपलब्धता

अधिवास नष्ट होण्याव्यतिरिक्त, शिकार आणि जमिनीसाठी पशुधनाशी स्पर्धा यामुळे वाघांच्या शिकारीचे प्रमाण कमी होत आहे, हे वाघांच्या मोठ्या भागांसाठी एक गंभीर धोका बनत आहे. वाघांच्या शिकारीवर जास्त दाब असल्याने शिकारीची संख्या कमी होते. म्हणूनच, वाघ अन्नाच्या शोधात गावांकडे येतील. आजकाल संघर्ष होण्याची शक्यता जास्त असते जिथे मानवी अधिवास आणि वाघांचे अधिवास हस्तक्षेप करतात, एकतर राखीव कडांवर किंवा जिथे लोक आतून किंवा वाघांच्या अधिवासाच्या शेजारी वनसंपत्ती गोळा करतात. भारतातील बहुउपयोगी जंगलांमध्ये, जिथे शिकार लोकसंख्या कमी आहे, वाघ आणि इतर मोठे मांसाहारी प्राणी दरवर्षी काही भागात १२% पशुधन कळप मारतात. रशियन सुदूर पूर्वेमध्ये, जिथे पशुधन कमी सामान्य आहे, तेथे पशुधनाचा नाश दर कदाचित दरवर्षी १०० प्राण्यांपेक्षा जास्त नसतो. ज्या कृतींमुळे लोक वाघांच्या अधिवासात प्रवेश करतात, जसे की पशुधन पाळणे किंवा पिके राखणे, त्यामुळे माणसांवर वाघांच्या हल्ल्याचा धोका वाढतो. वाघांची शिकार करण्याच्या कृतींमुळेही वाघांच्या हल्ल्याचा धोका वाढतो. उन्हाळ्याच्या महिन्यांत बाहेर किंवा तात्पुरत्या झोपड्यांमध्ये झोपणे हे हल्ल्याच्या वाढीव धोक्याशी जोडले गेले आहे. सुंदरबनमधील वाघ लाकूड, मध किंवा माशांच्या शोधात त्यांच्या स्थापित प्रदेशात प्रवेश करणाऱ्या मानवांवर हल्ला करतात, ज्यामुळे त्यांना त्यांच्या प्रदेशांचे रक्षण करावे लागते. सुमात्राम ध्ये, लोक जंगलाच्या काठाजवळील कामांमध्ये, विशेषतः शेती आणि इस्टेट पिकांमध्ये आणि उच्च किंवा मध्यम पातळीच्या अशांतता असलेल्या भागात गुंतलेले असताना वाघांचे मानवांवर हल्ले होण्याची शक्यता जास्त होती.





### सामाजिक-आर्थिक निर्धारक

संघर्षांचे मानवी परिमाण सामाजिक-सांस्कृतिक घटकांच्या विविध आणि गतिमान संयोजनाद्वारे निश्चित केले जाते. मानवी वाघ संघर्षांबद्दल सहिष्णुता पातळी आणि तीव्रता पातळी अनेक घटकांद्वारे निर्धारित केली जाते. यामध्ये दृष्टिकोन, धारणा, श्रद्धा प्रणाली, शैक्षणिक आणि मूल्य प्रणाली, धर्म आणि समुदायांसाठी पशुधनाचे आर्थिक महत्त्व समाविष्ट आहे. वाघांच्या हल्ल्यांच्या वाढत्या जोखमीमुळे वाघ आणि इतर भक्षकांबद्दल सावधगिरी बाळगणे किंवा नकारात्मक वृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. विशिष्ट भक्षक प्रजातींबद्दल नकारात्मक वृत्ती असलेले लोक समस्याग्रस्त प्राणी मारून भविष्यातील नुकसान टाळतात.

### वाघांची शिकार

वाघ हा आशियातील सर्वात जास्त मागणी असलेल्या शिकारी प्राण्यांपैकी एक आहे . १९ व्या आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला वाघांची शिकार मोठ्या प्रमाणात होत असे. ब्रिटिशांनी वसाहतवादी भारतात, स्वातंत्र्यपूर्व भारतातील महाराजांनी आणि पूर्वीच्या संस्थानांच्या खानदानी वर्गाने हा खेळ ओळखला आणि त्याचे कौतुक केले. एकच महाराजा किंवा इंग्रजी शिकारी त्यांच्या शिकार कारकिर्दीत शंभराहून अधिक वाघांना मारण्याचा दावा करू शकत होता.

१८७५ ते १९२५ या काळात ब्रिटिशांच्या ताब्यातील भारतात अवघ्या ५० वर्षांत ८०,००० हून अधिक वाघांची कत्तल करण्यात आली. काही शिकारी पायी चालत वाघांची शिकार करत असत. तर काही जण बकरी किंवा म्हशीला आमिष म्हणून बांधून माचणांवर बसत असत. १९११ मध्ये वसाहतवादी भारताच्या भेटीवर आलेल्या राजा जॉर्ज पाचव्याने १० दिवसांत ३९ वाघांना मारले.

ऐतिहासिकदृष्ट्या, वाघांची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते जेणेकरून त्यांची प्रसिद्ध पट्टेदार कातडी गोळा करता येईल. आंतरराष्ट्रीय संवर्धन प्रयत्न प्रभावी होण्यापूर्वी, १९६० च्या दशकात वाघांच्या कातडीचा व्यापार शिगेला पोहोचला. १९७७ पर्यंत, इंग्रजी बाजारात वाघाच्या कातडीची किंमत ४,२५० अमेरिकन डॉलर्स मानली जात होती. याचे एक उदाहरण म्हणजे नरभक्षक अवनीची वादग्रस्त हत्या . प्रोजेक्ट टायगरच्या ५० वर्षांच्या स्म रणार्थ आयोजित कार्यक्रमात, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी २०२३ मध्ये वाघ, सिंह, बिबट्या, हिम बिबट्या, चित्ता, जग्वार आणि प्यूमा या सात मोठ्या मांजरींच्या संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय बिग कॅट अलायन्स (खइउ) ची सुरुवात केली. या मोठ्या मांजरींच्या नैसर्गिक अधिवासांना व्यापणाऱ्या विविध देशांपर्यंत पोहोचण्याचे या युतीचे उद्दिष्ट आहे. खइउ या वन्य रहिवाशांच्या संवर्धनासाठी जागतिक सहकार्य आणि प्रयत्नांना बळकटी देण्याचा प्रयत्न करते.

भारताच्या अलिकडच्या वाघ संवर्धनातील उपक्रमांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकार्य, अनुकरणीय व्यवस्थापन पद्धतींची ओळख, संरक्षित क्षेत्रांचा विस्तार आणि जागतिक मानकांचे पालन यांचा सम ावेश असलेल्या बहुआयामी दृष्टिकोनावर प्रकाश टाकण्यात आला आहे. भारतातील वाघांच्या संख्येचे दीर्घकालीन अस्तित्व आणि भरभराट सुनिश्चित करण्यासाठी हे प्रयत्न महत्त्वाचे आहेत आणि जगभरातील संवर्धन धोरणांसाठी एक आदर्श म्हणून काम करतात.

# औषधनिर्माण शास्त्र : ज्ञान, सेवा आणि संधी यांचा संगम

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षणाची उपलब्धता हे आजच्या काळातील महत्त्वाचे आव्हान आहे. शिक्षणाच्या संधी शहरापुरत्या मर्यादित राहिल्यास ग्रामीण तरुणांचे भविष्य संकुचित होते. हे वास्तव लक्षात घेऊन, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. अरुणदादा बारबोले यांच्या दूरदृष्टीने आणि सामाजिक बांधिलकीतून बार्शी तालुक्यातील पहिले व्यावसायिक औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय - सोजर कॉलेज ऑफ फार्मसी ची स्थापना झाली.







**कल्पनेची पाळंमुळं आणि अंमलबजावणी :**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातच दर्जेदार व्यावसायिक शिक्षण मिळावे, विशेषतः आरोग्यसेवेशी निगडित अशा फार्मसी सारख्या क्षेत्रात त्यांना करिअरची संधी मिळावी, या उद्देशाने या महाविद्यालयाची संकल्पना आकारास आली. ही संकल्पना एक सामान्य स्वप्न नव्हते - ती होती ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सशक्तीकरणाची सुरुवात. श्री. अरुणदादांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI), महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) यांच्या मान्यतेने अभ्यासक्रम सुरू केले. शिक्षणासाठी आवश्यक सर्व भौतिक सुविधा, आधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, अनुभवी शिक्षकवृंद आणि नैतिक मूल्यांवर आधारित शैक्षणिक वातावरण यामुळे सोजर कॉलेज आज विद्यमान काळात ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी विश्वासार्ह शैक्षणिक केंद्र ठरले आहे.

**फार्मसी व्यवसाय - सेवा आणि संधी:**

फार्मसी ही केवळ औषध विक्री करणारी भूमिका नसून ती आरोग्य सेवेतील महत्त्वाची दुवा आहे. फार्मासिस्ट हा डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील वैज्ञानिक पूल असतो. औषधनिर्मिती, गुणवत्ता नियंत्रण, औषध वितरण, वैद्यकीय लेखन, क्लिनिकल रिसर्च अशा विविध शाखांमध्ये फार्मासिस्टला भरपूर संधी असतात. आजकाल भारतात तसेच परदेशातही फार्मासिस्टसाठी अनेक करिअरच्या वाटा खुल्या आहेत. यामध्ये हॉस्पिटल फार्मसी, इंडस्ट्रियल फार्मसी, मेडिकल कोडिंग, फार्माकोव्हिजिलन्स, रिसर्च अँड डेव्हलपमेंट अशा क्षेत्रांचा समावेश होतो.

**ग्रामीण विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्रांती :**

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे फक्त शिक्षण देणारे केंद्र नाही, तर ते एक प्रेरणास्थान आहे. बार्शीसारख्या तालुक्याच्या ग्रामीण पट्ट्यातूनही जागतिक दर्जाचे व्यावसायिक तयार होऊ शकतात, हे सोजर कॉलेजने सिद्ध केले आहे. विद्यार्थी येथे केवळ पुस्तकी ज्ञान घेऊन जात नाहीत, तर ते नैतिक मूल्यं, सामाजिक बांधिलकी आणि व्यावसायिक कौशल्य घेऊन बाहेर पडतात.

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी हे केवळ एक व्यावसायिक महाविद्यालय नाही, तर ते ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भविष्याचा पाया घालणारे एक प्रेरणास्थान आहे. यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री. अरुणदादा बारबोले यांच्या दूरदृष्टीतून साकारलेले हे महाविद्यालय, बार्शी तालुक्यातील पहिलं व्यावसायिक फार्मसी महाविद्यालय म्हणून आज नावारूपाला आलं आहे. या संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळणारे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांचं योगदान या यशस्वी वाटचालीत मोलाचं आहे. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने शिक्षण, संशोधन, प्रशिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये अनेक महत्त्वपूर्ण मैलाचे दगड पार केले आहेत.

महाविद्यालयात आजमितीस ८५ लाख रुपयांहून अधिक किंमतीची अद्ययावत प्रयोगशाळा साधने, उपकरणे व तांत्रिक सुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने औषध निर्माण शास्त्राच्या प्रत्येक पैलूचा अनुभव देता यावा, यासाठी अत्यंत नियोजनबद्ध व गुणवत्तापूर्ण साधन सामुग्रीची गुंतवणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष प्रयोगात्मक कौशल्यही आत्मसात करता येते.

याशिवाय, महाविद्यालयाचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल ही आणखी एक महत्त्वाची बाजू आहे. या विभागामार्फत दरवर्षी विविध औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्याख्याते, कार्यशाळा, प्रात्यक्षिके व संवाद सत्रांचे आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे तर सॉफ्ट स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, टीमवर्क, आणि व्यावसायिक आचारसंहिता यांचेही प्रभावी प्रशिक्षण दिले जाते. याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आजपर्यंत १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना विविध नामांकित फार्मास्युटिकल कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळवून दिले गेले आहे.

हे यश केवळ आकड्यांपुरते मर्यादित नाही, तर त्यामागे असलेली भावना म्हणजे - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही जागतिक पातळीवर स्पर्धा करण्याची क्षमता आहे, हे सिध्द करणे. आज सोजर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी केवळ राज्यातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात आपले ज्ञान, मेहनत व कौशल्य यांच्यावर आधारित ठसा उमटवलेला आहे. हीच या महाविद्यालयाची खरी ओळख आणि अभिमानाची गोष्ट आहे.

**नव्या वाटा, नव्या दिशा :**

संस्थेचे ध्येय आहे की, ग्रामीण भारतातील विद्यार्थ्यांना आरोग्यसेवेत सक्रिय भूमिका बजावण्यासाठी तयार करणे. अधिक संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग संधींसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे हेही संस्थेच्या भविष्यातील योजना आहेत.श्री. अरुणदादा बारबोले यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या सोजर कॉलेज ऑफ फार्मसीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण देण्याची जबाबदारी पार पाडली आहे. ही संस्था म्हणजे शिक्षण, सेवा, आणि समाजबांधणी यांचा संगम आहे. आज सोजर कॉलेजचा विद्यार्थी हा केवळ एक पदवीधर नसून एक सजग, सक्षम आणि सेवाभावी फार्मासिस्ट आहे.


दै. सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

श्री.भारत चौधरी | सौ.पृथा चौधरी

वैशिष्ट्ये
- बार्शीतील पहिले मॉडेल सेंटर
- १६ सर्वोत्कृष्ट संगणक संस्था पुरस्कार
- २५ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण
- ८ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचे दर्जेदार करिअर
- प्रॅक्टीकल व डेमो दररोज २ तास
- मुलींसाठी स्वतंत्र बॅचेस लेडीज फॅकल्टीसह
- ६० कॉम्प्युटरची प्रशस्त लॅब

COURSES: MS-CIT | MS-ACIT | Tally Expert with G.S.T. | AutoCAD | GCC-TBC- English/Marathi/Hindi 30/40 | Speak English | D.T.P. | Hardware & Networking | 3D Max. | Internet+Google Tools | Catia

DIIT Since 1996 ज्ञानेश्वरी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी

भगवंत मंदिराच्या पाठीमागे,डॉ.जाधव हॉस्पिटलच्या पाठीमागे, समर्थ क्लासेसच्या जवळ, बार्शी. ☎: २२५५३२,२२८३०३ मोबा.: ९३७२२३१८२२



दैं. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!

* शुभेच्छुक *

ॲड. वासुदेव नरहरी ढगे

'मातोश्री कॉम्प्लेक्स', ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर



दै.तरुण भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !

KARNATAK LINGAYAT EDUCATION SOCIETY

Dr.Prabhakar B. Kore
Chairman K.L.E.Society

* शुभेच्छुक *

सिल्व्हर ज्युबिली बालक मंदिर.

सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर.

सिल्व्हर ज्युबिली प्राथमिक शाळा.

सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल.

माजी विद्यार्थी संघ

मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, शालेय - विद्यार्थी व पालक



दै. सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

NOTARY Gov. of India

ॲड. प्रविण प. करंजकर

नोटरी (भारत सरकार)

मो. ९८२२०६५६६१

रघुकुल, पाटील प्लॉट, बार्शी जि. सोलापूर ४१३४०१



तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!

* शुभेच्छुक *

श्री. निखिल नंदकुमार बडवे

(सहशिक्षक हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर व संस्कृत भारती जिल्हा संयोजक)



दैं. तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !!

प्रोप्रा. बाबासाहेब कापसे मो. ९८२२२८६५५२

भाऊ कापसे मो. ९५५२२२९९१८

महेश कापसे मो. ९४२२०२७३१८

मे. सद्गुरु

* बोअरवेल्स, * ट्रान्सफॉर्मर्स

* इलेक्ट्रिकल्स * अर्थमुव्हर्स

* सिमेंट प्रॉडक्ट

प्लेटा, बँच, बाथरुम, पाण्याच्या टाक्या, जनावरांची गव्हाण, तुळशी वृंदावन, गरीबाच्या स्वप्नातील घर

३९०३, भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी-४१३४०१


## हृदयरुग्णांचा आधार - डॉ. क्रांती कोळी यांचे माधवबाग, बार्शी

**'भिषगद्रव्यानुपस्थाता रोगी पादचतुष्टयम'**

आरोग्य व्यवस्थेचे चार प्रमुख घटक असलेल्या डॉक्टर, औषध, परिचारक व रुग्ण यापैकी डॉक्टरांच्या सन्मानार्थ १ जुलै रोजी डॉक्टर्स डे साजरा केला जातो. जे डॉक्टर्स आपल्या रुग्णाला कमीत कमी औषधे देऊन व्याधीमुक्त करतात त्यांना शास्त्रामध्ये मानाचे स्थान आहे. माधवबागमध्ये रुग्णांच्या जीवनशैलीवर प्रामुख्यांने काम केले जाते. त्यामुळे रुग्णाला जास्त शारिरीक, आर्थिक व मानसिक ताण पडत नाही आणि आजारदेखील समूळ बरा होऊ शकतो. मागील २५-३० वर्षात आपल्या जीवनशैली मध्ये प्रचंड बदल झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून आज जवळपास प्रत्येक घरात हार्ट अॅटक, ब्लॉकेजेस. डायबेटीस बी.पी. लठ्ठपणा PCOD, कोलेस्ट्रॉल जसे त्रास असलेले सदस्य आढळून येतात. पूर्वी वयाच्या ५० नंतर येणारे आजार सध्या तरुणाईसाठी जीवघेणे ठरु पाहत आहेत. हृदयरोगावर विनाशस्त्रक्रिया आयुर्वेदिक उपचार करणारी माधवबाग ही जगातली एक अग्रगण्य हार्ट केअर इंस्टिट्यूट आहे. संपूर्ण भारतात ३५० पेक्षा जास्त शाखांमधून १० लाखापेक्षा अधिक रुग्णांनी आजवर उपचार घेतलेले आहेत.

डॉ. क्रांती यांचे २००८ साली वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बार्शीतील जगदाळे मामा व कॅन्सर हॉस्पिटल सोबतच पुण्यातील नामांकित हॉस्पिटलमध्ये त्यांनी सेवा दिली. रुबी हॉल येथून इमर्जन्सी मेडिसिनमधील पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केले. २०१२-१३ साली पुण्यातील स्वत:च्या मल्टी स्पेशालिटी क्लिनिकमध्ये व्यस्त असतानाच माधवबाग पुणे येथे असंख्य हृदयरुग्णावर डॉ. कोळी दांपत्याने उपचार केले.

माधवबागच्या हृदयरोगावरील अत्यंत प्रभावी व पारदर्शक उपचारांची आपल्या भागातील गरज ओळखून डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांनी २०१४ साली बार्शी शाखेचा शुभारंभ केला. उत्तम सेवा आणि रुग्णांना मिळणारा पटकन आराम यामुळे अल्पावधीत, भूम, परंडा, वाशी, कळंब, कुर्डूवाडी, माढा, वैराग, तुळजापूर, धाराशिव, बीड येथून रूग्णांचा मोठा ओघ सूरू झाला. रूग्णसेवेला नेहमी प्राधान्य देऊन सर्व निकषांवर पात्र ठरल्यामुळे माधवबागमधी 'बेस्ट क्लिनिक' सह अनेक पुरस्कारांनी क्लिनिकचा सन्मान झाला आहे. धाराशिव परिसरातील रुग्णांच्या सोयीसाठी डॉ. पवन कोळी यांनी २०१८ साली माणिक चौक येथे नवीन शाखा सुरु केली. २०२४ पर्यंत प्रामाणिक सेवा देऊन परिसरात प्रचंड नावलौकिक निर्माण केला. मात्र सध्या ते बार्शीत स्वत:च्या प्रशस्त इमारतीमध्ये डॉ. क्रांती यांच्या समवेत प्रचंड वाढलेल्या रुग्णांना सेवा देण्यासाठी सज्ज झालेले आहेत.





हृदयविकार म्हणजे केवळ हार्ट अॅटॅक नसून हृदयाच्या स्नायूंना रक्तपुरवठा होणे. स्नायूंची ताकद कमी होणे, कोरनरी आर्टरीजची लवचिकता कमी होणे. त्यात घाण म्हणजे अतिरिक्त चरबी जमा होणे, EF म्हणजे पंपींग कमी होणे हे सर्व हृदयविकारांचे विविध टप्पे आहेत. हृदविकार विकसित होण्यासाठी डायबेटिस, हाय ब्लडप्रेशर, लठ्ठपणा, तणावपूर्ण जीवनशैली इ. विविध रिस्क फॅक्टर्स कारणीभूत असतात. म्हणून माधवबाग मध्ये हृदयरोगासोबतच या रिस्क फॅक्टर्सवर देखील सर्वोत्तम उपचार उपलब्ध आहेत. शास्त्रोक्त उपचारांना रिसर्च आणि इव्हीडन्स बेस्ड उपचारांची जोड देऊन माधवबागने युनिक उपचार पद्धती तयार केली आहे. ही उपचारपद्धती जगभरातील हृदयरोग तज्ज्ञांच्या संघटनांनी स्वीकारली आहे.

माधवबागमध्ये सध्या ६५० पेक्षा जास्त डॉक्टर्स कार्यरत आहेत. सर्वात जुन्या डॉक्टरांपैकी असणाऱ्या डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांचे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय विकार याविषयीचे रिसर्च पेपर्स भारतासह, युरोप, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या ठिकाणी नामांकित हेल्थ जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. डायबेटिस असणाऱ्या रूग्णांना हार्टचा आणि हाय बी.पी. असणाऱ्यांना स्ट्रोक म्हणजे पॅरालिससचा धोका सभंवतो मात्र यामागे मूळ कारण असते रक्त वाहिन्यांची आतील भिंत म्हणजेच एन्डोथेलिअम खराब होणे माधवबागच्या संशोधनसिद्ध उपचारामुळे एन्डोथेलिअमचे आरोग्य सुधारते व हृदयविकारांचा धोका कमी होतो. एन्डोथेलिअम सुस्थितीत असेल तर बऱ्याच रूग्णांना अँजिओग्राफी मध्ये ब्लॉकेज असून सुद्धा हार्ट अॅटॅक येत नाही. आणि एन्डोथेलिअम खराब असणाऱ्या व्यक्तीला ब्लॉकेज नसतानादेखील हार्ट अॅटॅक येऊ शकतो. माधवबागच्या जगतमान्य पंचकर्म व विविध आजारानुसारचे डायट बॉक्सेस हे हृदयविकाराचा धोका कमी करण्यास नक्कीच मदत करतात. त्यामुळेच बार्शी शाखेच्या असंख्य रुग्णांचे आजवर अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास अशा खर्चिक शस्त्रक्रिया टाळल्या गेल्या. तसेच कित्येक रुग्णांच्या डायबेटिस, हायब्लड प्रेशर च्या औषधांचे प्रमाण कमी करून देखील आजार आटोक्यात आहेत. हृदय रूग्णांनी तसेच चाळीशी पूर्ण केलेल्या सर्वांनी दर सहा महिन्यांला स्ट्रेस टेस्ट म्हणजे TMT डायबेटिस असणाऱ्यांनी तर दर तीन महिन्यांनी HBA1C आणि हाय बी.पी. असणाऱ्यांनी वेळोवेळी ॲम्ब्यूलेटरी ब्लडप्रेशर मॉनिटरिंग (ABPM) तपासणी करून घ्यावी.

### * महत्वाचे *

- * २०१४ पासून बार्शी येथे अखंड सेवा.
- * हृदयरोग, डायबेटिस, हायब्लड-प्रेशर, लठ्ठपणा इ. आजारावर यशस्वी उपचार घेतलेल्या हजारो जणांचा परिवार.
- * सुसज्ज व आधुनिक पंचकर्म विभाग.
- * प्रशिक्षित व कुशल पंचकर्म थेरपिस्ट
- * स्ट्रेस टेस्ट (TMT) (ABPM), रक्ताच्या सर्व तपासण्या उपलब्ध.
- * रिसर्च व इव्हीडन्स बेस्ड पंचकर्म थेरपिज आणि डायट बॉक्सेस
- * लवकरच NABH मानांकन पूर्ण होणार आहे.

डॉ. क्रांती यांचे आई वडील प्रा. हेमंत शिंदे व माधुरी शिंदे तसेच डॉ पवन कोळी यांचे आईवडील मोहनराव कोळी व मीना इटेवाड-कोळी हे शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे आपणही समाजाचे कांहीतरी देणं लागतो ही भावना दोघांच्याही मनात लहानपणा पासूनच रुजलेली आहे. म्हणूनच करिअरच्या सुरुवाती पासूनच या दोघांनी आजवर असंख्य मोफत तपासणी शिबीरे, आरोग्य जनजागृतीविषयी व्याख्याने घेतली आहेत. अनेक सेवाभावी संस्थांना व गरजू रुग्णांना शक्य त्या प्रकारे मदत केली आहे. हजारो रूग्णांच्या शुभेच्छा आणि आशीवार्दाच्या पाठबळामुळे बार्शी शाखा लवकरच स्वत:च्या सुसज्ज इमारती मध्ये सेवा देण्यासाठी सज्ज झाली आहे. डॉ. क्रांती व पवन कोळी यांचा माधवबागच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रूग्णांची सेवा करण्याचा ध्यास खरोखरच कौतुकास्पद आहे.


माधवबाग
बार्शी २०१४ पासून आपल्या सेवेत..



माधवबाग™ बार्शी

मल्टीडिसिप्लिनरी कार्डियाक केअर क्लिनिक्स् अ‍ॅन्ड हॉस्पिटल्स्

बार्शी २०१४ पासून आपल्या सेवेत..

३० च्या पुढे वय, चालताना दम/धाप, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब (बी.पी.), वाढलेले वजन किंवा कोलेस्टेरोल, पायांवर सूज, अशी लक्षणे असतील किंवा यापूर्वी हार्ट अटॅक येऊन गेला असेल, अँजिओग्राफी-अँजिओप्लास्टी-बायपास झाली असेल अथवा करुन घेण्याचा सल्ला मिळाला असेल, स्ट्रेस टेस्ट (TMT) पॉझिटिव्ह आली असेल तर आजच बार्शी क्लिनिकला तपासणी करुन घ्या व योग्य मार्गदर्शनानंतर तणावमुक्त आयुष्य जगा.

व्याधीनुसार आहाराचे डायट बॉक्सेस

Swasthyam | Prameha | GOBIPI | REVERSE

माधवबागच्या संपूर्ण हृदय शुद्धीकरण थेरपीज© SHS

आम्ही फक्त हृदयविकाराचा उपचार करत नाही, तर त्याला परतवून लावतो.


डॉ. क्रांती कोळी


डॉ. पवन कोळी

ठळक वैशिष्ट्ये
- २०१४ पासून बार्शी येथे अखंड सेवा.
- पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र पंचकर्म विभाग आणि प्रशिक्षित थेरपीस्ट.
- आजारानुसार रिसर्च व इविडन्स बेस्ड डायट बॉक्सेस व पंचकर्म थेरपीज.
- हृदयाचा रक्तपुरवठा व $VO_2Max$ दर्शवणारी कम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट.
- डॉ. क्रांती व डॉ. पवन कोळी यांचे रिसर्च पेपर्स देश विदेशातील नामांकित हेल्थ जर्नल्स मध्ये प्रकाशित.
- पेशंट इम्प्रुव्हमेंटसाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित क्लिनिक्स.




सुसज्ज पंचकर्म विभाग


डॉ. रोहित साने यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना

FOLLOW US :

छत्रपती कॉलनी, बाळेश्वर नाका, कुर्डूवाडी रोड, बार्शी ✆ 7276519111 / 8605191110

# हृदय तुमचे... काळजी व उपचार आमचे..

## सुश्रृत हॉस्पिटल, बार्शी मध्ये आता महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत स्टेमी हब आणि स्पोक मॉडेलच्या माध्यमातून सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील हृदय विकार (हार्ट अ‍ॅटक) चे निदान झालेल्या रुग्णांसाठी महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्याच्या माध्यमातून एन्जोग्राफी, एन्जोप्लॅस्टी व पेसमेकरची मोफत उपचार व शस्त्रक्रिया उपलब्ध.

PATIENT SAFETY & QUALITY OF CARE
NABH (ENTRY LEVEL)
PRE ACCREDITED

स्टेमी म्हणजे एसटी एलिव्हेशन मायोकार्डियल इन्फार्क्शन हा हृदयविकाराचा आजार आहे. ज्यामध्ये हृदयाच्या स्नायूंना रक्तपुरवठा करणाऱ्या एका किंवा अधिक रक्तवाहिन्यांमध्ये अचानक अडथळा निर्माण होतो. यामुळे हृदयाच्या स्नायूंचा भाग ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे मृत होत असतो. स्टेमी हा एसीजीद्वारे एसटी सेगमेंट एलिव्हेशनद्वारे ओळखला जातो. यामध्ये त्वरील वैद्यकीय उपचार करणे आवश्यक असते. सामान्यत: एन्जोप्लॅस्टी किंवा थ्रॉम्बोलायसिसद्वारे अडथळा दूर करतात.
*** स्टेमीची लक्षणे :** छातीत तीव्र वेदना आणि डोळ्यांसमोर अंधारी येणे, घाम फुटणे, श्वासोच्छवासास त्रास होणे. स्टेमी प्रकारामध्ये येणाऱ्या रुग्णांचे उपचार गोल्डन आवरमध्ये म्हणजे एक ते दीड तासामध्ये झाल्यास रुग्णाा त्याचा खूप फायदा होतो. स्टेमी प्रकल्पांतर्गत सरकारी दवाखान्यामध्ये (सोलापूर/धाराशिव) ईसीजी काढल्यानंतर ज्या रुग्णांचे स्टेमी अलर्ट येतो, त्या रूग्णांना पुढील उपचारांसाठी (हब) म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत संलग्न असणाऱ्या सुश्रृत हॉस्पिटल बार्शीमध्ये तज्ञ डॉक्टरांसोबत १०८ ॲम्ब्युलन्समधून उपचारासाठी पाठवले जाते. या रुग्णावरती महात्मा ज्योतीबा फुले योजने अंतर्गत मोफत उपचार होतात. खाजगी रुग्णालयामध्ये हृदय रोगाच्या उपचारासाठी १.५ ते २ लाख रुपये इतका खर्च येतो. परंतु, स्टेमी योजने अंतर्गत रुग्णावरती मोफत उपचार केले जातात.



डॉ. संजय अंधारे
M.D. (Medicine)












स्टेमी प्रकल्प लागू असलेले सुश्रुत हॉस्पिटल, बार्शी हे एन.ए.बी.एच. मानांकनप्राप्त हॉस्पिटल आहे. रुग्ण केंद्रबिंदू व रुग्णसेवा हे ध्येय मानून कार्यरत असणारे तसेच कोरोना काळात १० हजारांहून अधिक रुग्णांवर उपचार करत त्यांना जीवदान देणाऱ्या व कोरोना वॉरियरसह विविध पुरस्कारांनी सन्मानित सुप्रसिध्द फिजीशियन डॉ. संजय अंधारे यांच्या सुश्रुत हॉस्पिटल, बार्शीची स्थापना २०१३ साली झाली असुन डॉ. अंधारे हे गेली २५ वर्षे बार्शीच्या वैद्यकिय विश्वात कार्यरत आहेत. सुश्रृत हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर प्रशिक्षीत तंत्रज्ञ, कुशल परिचर्या/सुश्रूषा सेवा व ऑपरेशन थिएटर्स, इन्टेंसीव केअर युनिट, डायलेसिस युनिट व कॅथलॅब विभाग कार्यरत असुन आजपर्यंत ५००० हून अधिक एन्जोग्राफी, १५०० एन्जोप्लास्टी व ४० पेसमेकर बसविणे, हृदयाचे छिद्र बुझविणे व हृदयाचे कमी व जास्त अनियंत्रीत ठोके नियंत्रीत करणाऱ्या कित्येक रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रीया पार पाडल्या आहेत.

हृदय विकाराची लक्षणे जाणविणाऱ्या रुग्णांना शासकिय रुग्णालयामार्फत प्राथमिक तपासणी व ईसीजी काढून सुश्रृत हॉस्पिटल बार्शी येथे स्टेमी प्रकल्पा अंतर्गत समन्वयक वैद्यकिय अधिकारी डॉ. अजित सगरे मो. ९४२१४७९०९२ यांच्याशी संपर्क साधून या प्रकल्पाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुश्रुत हॉस्पिटल, बार्शी करीत आहे.

दै. सोलापूर तरुण भारत च्या ४१ व्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
* शुभेच्छुक *
आनंद मेकॅनिकल वर्क्स
आमच्याकडे सर्व प्रकारच्या पंपाची दुरुस्ती करुन मिळेल.
तेलगिरणी चौक, बार्शी, जि. सोलापूर

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये सुयश विद्यालय, बार्शी महाराष्ट्रात नं. १
Foundation Course + शिष्यवृत्तीचा अभ्यास, तरीही २३१ विद्यार्थी पात्र

इ. ५ वी १२७ विद्यार्थी पात्र ५० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक
इ. ५ वी चे राज्य गुणवत्ता यादीतील ६ गुणवंत
राज्यात ७ वी, जिल्हात प्रथम – स्वरा इतापे गुण 282
राज्यात ९ वा, जिल्हात २ रा – कृष्णमेघ निकम गुण 280
राज्यात १४ वी, जिल्हात ४ थी – माही इतापे गुण 274
राज्यात १४ वी, जिल्हात ४ थी – सुखदा शेळवणे गुण 274
राज्यात १६ वा, जिल्हात ९ वा – अव्दैत गजभार गुण 272
जिल्हात १२ वी – विशाखा गव्हाणे गुण 268
जिल्हात १५ वा – श्लोक आवाड गुण 266
राष्ट्रीय ग्रा. १० वा – आरुष काशिद गुण 274

इ. ८ वी १०४ विद्यार्थी पात्र ४९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक
इ. ८ वी चे राज्य गुणवत्ता यादीतील ८ यशवंत
राज्यात ५ वी, जिल्हात प्रथम – साक्षी हाके गुण 286
राज्यात ७ वा, जिल्हात ३ रा – श्रेयश काशीद गुण 282
राज्यात ८ वी, जिल्हात ५ वी – श्रावणी देशमुख गुण 280
राज्यात १० वी, जिल्हात ६ वी – सिध्दी जाधव गुण 278
राज्यात १२ वी, जिल्हात ८ वी – मधुरा ताकभाते गुण 276
राज्यात १६ वा, जिल्हात १२ वा – व्यंकटेश डगे गुण 272
राज्यात १६ वी, जिल्हात १२ वी – संजीवनी राखे गुण 272
राष्ट्रीय ग्रा. १० वी – रिध्दी उकिरडे गुण 274

इ. ५ वी चे शिष्यवृत्तीधारक ५० विद्यार्थी

| विषय | वैशिष्ट्ये |
| --- | --- |
| गणित | १०० पैकी १०० गुणप्राप्त ६ विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. वैशाली गाडे |
| इंग्रजी | ५० पैकी ५० गुणप्राप्त ३४ विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. अर्चना घोलप |
| बुध्दीमत्ता | ९० पेक्षा जास्त गुणप्राप्त ७ विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. सोनाली बोंगाळे |
| मराठी | ४० पेक्षा जास्त गुणप्राप्त ५ विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. रेश्मा बोधले |

इ. ८ वी चे शिष्यवृत्तीधारक ४९ विद्यार्थी

| विषय | वैशिष्ट्ये |
| --- | --- |
| गणित | १०० पैकी १०० गुणप्राप्त १० विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. विजयालक्ष्मी सुरवसे |
| इंग्रजी | ५० पैकी ५० गुणप्राप्त १३ विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. सुनिता शेटे |
| बुध्दीमत्ता | ९० पेक्षा जास्त गुणप्राप्त १० विद्यार्थी मार्गदर्शक : सौ. सोनाली बोंगाळे |
| मराठी | ४० पेक्षा जास्त गुणप्राप्त १३ विद्यार्थी मार्गदर्शक : श्री. शैलेश नेवरे |

माध्यमिक शालांत परीक्षेतही सुयशचा पॉवरफुल पॅटर्न
सुयश विद्यालय, बार्शी. १००% निकालाची परंपरा कायम
९८.४०% चा प्रथम तर ९५% पेक्षा जास्त गुणप्राप्त २० यशवंत विद्यार्थी
प्रसाद मुसळे 98.40% विज्ञान : 99 गुण
समृध्दी भोसले 98.20%
नंदिनी केमदारने 97.60%
संस्कृती उबाळे 97.40%
अक्षदा पवार 97.20%
गायत्री कारंडे 97.20%
वैष्णवी भोंग 96.80% विज्ञान : 99 गुण
ओम देशमुख 96.60%
मधुंद गाडेकर 96.50% विज्ञान : 99 गुण
आझम शेख 96.20%
अजिंक्य मारडकर 96.00%
प्रणव कानकात्रे 95.60%
मुग्धा प्रतापे 95.40%
श्रेया शिंदे 95.20%
ओम आटोळे 95.20%
संजना तोंडले 95.00%
संस्कृती टोकरे 95.00%
संस्कृती बसवंत 95.00%
भालके प्रतिक्षा 95.00%
वेदांतीका जगदाळे 95.00%

* 90% पेक्षा जास्त गुण प्राप्त 47 विद्यार्थी. * 80% पेक्षा जास्त गुण प्राप्त 102 विद्यार्थी. * 75% पेक्षा जास्त गुण प्राप्त सर्वच 154 विद्यार्थी.

* विषय निहाय निकालाची वैशिष्ट्ये *

* मराठी : शिक्षिका – सौ. शुभांगी सावंत M.A., B.Ed.
* 97 गुणांचा प्रथम क्रमांक
* 95 पेक्षा जास्त गुणप्राप्त 12 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 55 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 123 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त सर्वच 154 विद्यार्थी

* इंग्रजी : शिक्षक – श्री. चेतन जाधव M.A., B.Ed.
* 96 गुणांचा प्रथम क्रमांक
* 95 पेक्षा जास्त गुणप्राप्त 5 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 73 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 127 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त सर्वच 154 विद्यार्थी

* गणित : शिक्षिका – डॉ. माधुरी तोडकरी M.Sc. Phd.
* 99 गुणप्राप्त 3 विद्यार्थी
* 95 पेक्षा जास्त गुणप्राप्त 19 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 47 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 83 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त 125 विद्यार्थी

* विज्ञान : शिक्षिका – सौ. ममता जठार M.Sc., B.Ed.
* 99 गुणप्राप्त 3 विद्यार्थी
* 95 पेक्षा जास्त गुणप्राप्त 15 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 37 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 74 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त 110 विद्यार्थी

* सा.शास्त्रे : शिक्षिका – सौ. गितांजली माळी M.A., B.Ed.
* 98 गुणप्राप्त 9 विद्यार्थी
* 95 पेक्षा जास्त गुणप्राप्त 22 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 50 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 88 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त 121 विद्यार्थी

* हिंदी : शिक्षिका – सौ. उर्मिला जोगी M.A., B.Ed.
* 95 गुणप्राप्त 3 विद्यार्थी
* 90 पेक्षा जास्त गुणप्राप्त 36 विद्यार्थी
* 80 पेक्षा जास्त गुणप्राप्त 101 विद्यार्थी
* 75 पेक्षा जास्त गुणप्राप्त 145 विद्यार्थी

सर्वच यशवंताचे हार्दिक अभिनंदन
पुढील शिक्षणातील उज्वल यशासाठी शुभेच्छा !
शुभेच्छुक
पालक शिक्षक संघ, सुयश विद्यालय, बार्शी

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
मो. 9545418888
ॲड. जाधव पी. डी.
M.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
बारबोले प्लॉट, शिवशक्ती मैदानाच्या पाठीमागे, बार्शी, जि. सोलापूर
मो. 7588215259, 9922019918
ॲड. घोळवे आर. एन.
(घोळवेवाडी) B.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
अलिपूर रोड, शंकर-पार्वतीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
मो. 9822057082
ॲड. एस.जे. क्षीरसागर
(B.Com.,LL.M)
मो. 9511758918
ॲड. पी.एस. क्षीरसागर
(B.A.LL.B)
मो. 7972788123
ॲड. ए.एन. बिडबाग
(B.A.LL.B)
अति.जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ऑफिस – सि.स.नं. ६८४, हांडे गल्ली, बार्शी, जि. सोलापूर
निवास – नाईकवाडी प्लॉट, उपळाई रोड, बार्शी.

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
भारत सरकार नोटरी
मो. 9850277944
9423327580
ॲड. श्री.आर.यू. वैद्य
(उपळाईकर) B.A.,LL.B.
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ॲड. श्री. के.पी. राऊत, ॲड. एस.पी. शहा
ऑफिस : ''श्री विठ्ठल निवास'' आदित्य कृष्णानगर उपळाई रोड, दोन लिंबा जवळ, बार्शी, जि. सोलापूर

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !
ओम-शिवम उद्योग समूह
घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
प्रोप्रा. दशरथ विठ्ठल उकिरडे
B.Sc. (Hons.)
तालुका अध्यक्ष - भाजपा पंचायत राज व ग्रामविकास ता. बार्शी.
संचालक - जनस्वराज्य फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य.
मो. 9359516130




# विकासाच्या वाटेवरील सोलापूर

**आपले शहर जेव्हा विकासाच्या वाटेवर चाललेले दिसतं तेव्हा तेथील प्रत्येक नागरिकाला त्याचा अभिमान वाटतो. सोलापूर शहर तसे गिरणगाव म्हणून ओळख असलेले चादरीचे गाव म्हणून प्रसिद्ध होते. ते कालमानाने म्हणा की राजकीय दुर्लक्ष तसेच नागरिकांची मरगळ, उदासीनता यामुळे गिरण्या बंद होऊन विकासाच्या पासून वंचित राहण्यास कारणीभूत ठरले आहे असे मला म्हणावे वाटते. सोलापूर शहरावर सातत्याने होणारे अन्याय आणि तो बिनविरोध सहन करणारे अति सहनशील नागरिक आणि त्यांची आपण बरे, आपले काम बरे ! या प्रवृत्तीमुळे सोलापूर शहर बकाल झालेले दिसत होते. येथील प्रत्येक नागरिकांना कौटुंबिक जबाबदारी बरोबर सामाजिक जबाबदारी असते त्यावर आपल्या शहराचा विकासही अवलंबून असतो आणि त्या विकासामुळे नागरिक हा त्याचे फाय**

आपल्या महानगर पालिकेने सर्वच नागरिकांना घर,पाणी स्ट्रीट लाईट,ड्रेनेज,चांगले रस्ते, सार्वजिक शहर बस वाहतूक आधी सोयीसुविधा देणे बंधनकारक आहे कारण त्यासाठीचा कर आपण आगाऊ भरत असतो.या सर्व सोई सुविधांचा शहर विकासामध्ये मोलाचा वाटा असतो त्यामुळे महापालिका त्या सोयी सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देऊन त्यावरील योग्य ती अंमलबजावणी करत असते. आता आपले सोलापूर शहर स्मार्ट सिटी चे अंतर्गत विकास मार्गावर हळूहळू वाटचाल करत असताना स्मार्ट सिमेंट रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट, पाच दिवसा ऐवजी तीन दिवसानंतर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी दुसरी पाईपलाईन ही लवकरच व्यवस्थित रित्या कार्यान्वित होईल. शहरातील निरनिराळ्या भागातील कचरा उचलून शहर स्वच्छ आरोग्यदायी ठेवण्यासाठी घंटागाड्यांच्या माध्यमातून सर्व कचरा रोजच्या रोज उचलला जात आहे. त्यामुळे अस्ताव्यस्त व जाग



गिरीश दिवाकर दुनाखे
३०३, दुर्वांकुरदमानी नगर सोलापूर
मो.९६२३२३१४६३

आपल्या शहरातील शहर बस वाहतूक व्यवस्था सध्या ढासळली असल्यामुळे वैयक्तिक वाहने जास्त प्रमाणात रस्त्यावर दिसत असून त्यातून होणारे वायू प्रदूषण खूप आहे जर शहर बस वाहतूक ही एखाद्या तज्ञ अधिकारी माणसाच्या देखरेखी खाली पुन्हा नव्याने व्यवस्थितरित्या सुरू केली तर वायुप्रदूषणाला आळा बसण्यास मदत होईल. आपली शहर बस वाहतूक शहरातील वेगवेगळ्या भागात सब डेपो काढून त्या त्या भागातील नागरिकांच्या वेळेचे गणित घालून आणि त्यांना सोयीचे होईल अशा बसेस वेळचे वेळी शहरातील इतर भागात जाण्यासाठी उपलब्ध करून दिल्या तर लोक स्वतःचे वाहन न वापरता सार्वजनिक शहर बस वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर करतील त्यामुळे रस्त्यावरील ट्रॅफिकची समस्या दूर होईलच पण वायू प्रदूषणही कमी होण्यास मदत होईल. शहर बस वाहतूक ही सुद्धा त्या शहरातील विकासाच्या मार्गातील एक महत्त्वाची बाजू असून ते आपल्या शहर विकासाच्या वाटेवर असताना त्यात शहर हद्द वाढ झाल्याने त्या त्या भागात तेथील नागरिकांच्या करमणुकीसाठी तेथे बंदिस्त नाट्यगृह उपलब्ध करून देणे गरजेचे वाटते. विकास करताना नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देताना महानगरपालिकेने स्वतःचे कर्मचारी जे सातत्याने चांगले काम करत असतात त्यांचा ताण-तणाव दूर करण्यासाठी साहित्य नाट्य संगीत आधी करमाणुकीचे कार्यक्रम त्यांना सहभागी करून घेण्यास हरकत नसावी कारण पूर्वी गणेशोत्सवामध्ये व इतर राष्ट्रीय सुट्टी दिवशी महापालिकेत तीन अंकी नाटक, ऑर्केस्ट्रा, नाट्यसंगीत, आदी कार्यक्रम होत असत. त्यात हल्ली खंड पडल्याचे दिसते, तरी मागील वर्षी महापालिकेचे उपायुक्त श्री आशिष लोकरे साहेब यांच्या संकल्पनेतून आणि तत्कालीन आयुक्तांच्या पाठिंब्याने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे कार्यक्रम तिथे महाराष्ट्र साहि आपल्या शहराच्या विकासामध्ये जर जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषद मुख्याधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक हे जर कार्यक्षम मिळाले तर ते शहर विकासापासून वंचित राहू शकत नाही हे आपण पाहत आहोत आपल्याकडे विकास होण्यासाठी आता जे उड्डाणपूल, बायपास मार्ग ,उत्तम परिवहन व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था, उत्तम वाहतूक व्यवस्था त्यातील नव्याने होणाऱ्या सुधारणा गरजेचे असतात आपल्या सोलापूर शहरात नुकतेच विकासाचा एक टप्पा गाठताना आपले विमानतळ सुरू होऊन तेथून विमान वाहतूकही सुरू झाली आहे. थोड्याच कालावधीत आणखी इतर शहरांना जोडणारी विमान वाहतूक आपल्याकडे सुरू होईल हे करताना यातील राजकारण बाजूला ठेवून समाजकारण करून जर या शहराला नव्या नव्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या तर या शहराचा विकास होऊन ते नक्कीच भरभराटीला जाऊ शकेल. आपले सोलापूर शहर स्मार्ट सिटीच्या माध्यमातून मिळणाऱ्या सोयी सुविधा मधून सर्व नवनवीन माध्यमे उपलब्ध होऊन विकास मार्गावर भरभराटीची वाटचाल करताना आपल्याला दिसेल अशी सदिच्छा प्रगट करतानाच दैनिक तरुण भारत सोलापूर यांना त्यांच्या वर्धापन दिनाबद्दल शुभेच्छा देतो आणि थांबतो.



# पाया संपन्नतेचा संस्कार मराठी मनाचा




**मी मराठी , माझी माय मराठी माझी संस्कृती मराठी माझे विचार मराठी , माझे आदर्शही मराठीच ज्ञानराज माऊली सारखी देवत्वाची प्रचिती देणारी संतभूमी गोरोबांचा संस्कार देणारी एकनाथ जनाबाई यांचे गुरुशिष्यत्व देणारी भूमी माझी महाराष्ट्र भूमी जिथे सर्वजण गुण्या गोविंदाने नांदतो तिथे असुरी प्रवृती कुठून जन्म घेऊ लागल्या आहेत हा मोठा प्रश्न आहे , इथे खून दरोडा स्त्रीत्वाचा अवमान अल्पवयीन मुलींवर लेकी बाळींवर आश्रम शाळेत होणारा अत्याचार, सरपंचाला मारून त्याच्या मृतदेहाची विटंबना करणारे क्रूरकर्मा माझ्या भूमीत कुठून आले इतकी क्रूर तरुणाई कुठून आली हे पाहण्याची संशोधना ची वेळ आपल्या वर येऊन ठेपली आहे वेळीच या गोष्टींना आवर घातला नाही तर पुढील पिढी नष्ट होण्यास वेळ लागणार नाही पशुसुद्धा भूकेशिवाय शिकार करीत नाहीत आणि माणूस पैशांसाठी किती रसातळाला चालला आहे माझी बहिणाबाई अशिक्षित असुन सुशिक्षितांना संस्कारीत करते त्यांच्या काव्यांमधून त्यांच्या लेखनातून त्या कितीतरी संस्कार देतात देतील शतकानुशतके पिढया दर पिढ्या सुसंस्कारीत करतील असा विश्वास आहे.**

पण पण पण आज आपल्या समाजाला मराठी माणसाला आहारा पासून विहारा पर्यंत प्रबोधनाची गरज आहे विनयाची गरज आहे नम्रतेची गरज आहे जो संस्कार आपल्याला निसर्ग देतो सकाळी उठण्याची वेळ पाळण्याचा संस्कार सूर्योदय देतो , दगड मारले तरी फळ फळावळ देऊन दानधर्माचा गुण वृक्षवल्ली देतात , सर्वच नैसर्गिक साधन संपत्ती सुव्यवस्थापनाचा संस्कार देतात,सर्वकाळ चिंतनाचे महत्व स्पष्ट करताना माऊली १३ अभंग ४ थ्या चरणामध्ये म्हणतात ज्ञानदेवी रम्य रमले समाधान । हरिचे चिंतन सर्वकाळ सर्वकाळ हरिचिंतन केल्यामुळे जीवनात समाधान प्राप्त होते आणि समाधानी मन सर्वांचे शुभ चिंतते सदा सर्वदा शुभ बोला शुभ चिंतन करा आणि शुभ वर्तन करा हेच जणू आपले संत ज्ञानेश्वर आणि सर्व अध्यात्म आपणास सांगते, इतक्या संपन्न भूमीत आपण जन्मलो आहोत तर या जन्माचे सोने करायचे की माती हे आपणच ठरवले पाहिजे ना ?सातशे वर्षांपेक्षा अधिक काळ ज्ञानेश्वरांना होऊन झाला, ज्ञानेश्वरी ही श्रीभगवदगीतेतील सातशे श्लोकाचे नऊ हजार ओव्यात, माऊलीने लिहलेली 'ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका ' आहे . तीचे लेखन कलीयुगात जगण्यासाठी मार्गदर्शक ठरते ,

अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक । हे माऊलीचे स्वप्न आहे .हे विश्व आनंदात न्हाऊन निघावे हेही माऊलीचे स्वप्न आहे ,हे विश्वची माझे घर ही भावना संपूर्ण मानव जातीत



डॉ. दीपांजली माने-पाटील
आदिशक्ती फाऊंडेशन, धाराशिव
मो. ७३८५३०१०१२

प्रसरूत होण्यासाठी ज्ञानेश्वरी समजून घेतली पाहिजे पसायदानाचा अर्थ समजून घेतला पाहिजे मानव जातीतील सत्ता लोलुपता, वखवखले पण,

द्वेष आणि हिंसेचे विचार नष्ट झाल्या शिवाय मानव जातीत बंधूभाव निर्माण होणार नाही भूता परसरे पडो मैत्र जीवाचे हे माऊलीचे मागणे तेव्हाच पूर्णार्थाने सफल होईल जगा आणि जगू द्या हा मंत्र सर्वांनी अवलंबला तरच हे विश्वची माझे घर होईल!

# मंगलताई शहा : एड्सबाधित अनाथ मुलांच्या आई

**सामाजिक संवेदना बोथट होत चाललेल्या काळात काही व्यक्ती मात्र वंचित, निराधार आणि दुर्बलाच्या जीवनात उजेड पेरण्याचे आणि आशेचा किरण जागविण्याचे अतिशय महत्तम कार्य पार पाडीत असतात. त्यापैकीच एक असलेल्या एड्सबाधीत रुग्णाची अत्यंत मनोभावे सेवा करणाऱ्या प्रभाहिरा प्रतिष्ठान व पालवी च्या संस्थापिका सौ. मंगलताई शहा ह्या होत.**

जनावरांच्या गोठ्यात अक्षरशः मरणासन्न अवस्थेत सौ. मंगलताईंना एचआयव्हीबाधित दोन लेकरं सापडली. याचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आले. त्या अस्वस्थ झाल्या. या मुलांना घरी घेऊन आल्या. त्यांनी या मुलांवर उपचार केले. आयुष्यभर या मुलांचा सांभाळ आणि संगोपन करायचे हे सौ. मंगलताईंनी मनोमन ठरवले.

एचआयव्हीबाधितांना नातेवाईक आणि समाजाच्या अहवेलनेला व भेदभावाला सामोरे जावे लागते. समाजाच्या दृष्टीने त्याज्य ठरलेल्या आणि समाजाने नाकारलेल्या एड्सग्रस्तांच्या मुलामुलींचा सांभाळ, संगोपन, शिक्षण, आरोग्य इत्यादीसाठी मंगलताईंनी २००१ साली '' पालवी '' या संस्थेची स्थापना केली. '' स्पर्श मायेचा पालवी आपुलकीची '' हे ब्रीद घेऊन ज्या एचआयव्हीबाधित मुलांना रेल्वेस्थानकावर, कचराकुंडीत, बसस्थानकात आणि स्मशानभूमीत टाकून दिले जाते. अशा निराधार मुलांना मायेची पालवी मिळाली.

झाडांना पालवी फुटली की झाडाला जगण्याची उमेद, नवी आशा मिळते. तशीच सकारात्मकता एचआयव्हीबाधित मुलांच्या आयुष्यात '' पालवी '' मुळे आली आहे. या संस्थेसाठी सौ. मंगलताई शहा ह्या अहोरात्र कार्य करीत आहेत. ही निश्चितच समाजातील सर्वांसाठीच ऊर्जादायी व प्रेरणादायी अशी बाब आहे.

सौ. मंगलताईंचा जन्म दिनांक ७ मे १९५३ रोजी बार्शी येथे हिरालाल रुपचंद दोशी व प्रभावती हिरालाल दोशी या दांपत्याच्या पोटी झाला. आई-वडिलांच्या संस्काराची शिदोरी आणि त्यांच्या स्मृतीचा गंध जपण्यासाठी त्यांनी आपल्या आईवडिलांच्या नावाने प्रभा हिरा प्रतिष्ठान ची स्थापना करून त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे.

सौ. मंगलताईंचे शिक्षण केवळ ९ वी पास आहे. परंतु कार्य मात्र शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च पदव्या धारण केलेल्या व्यक्तींपेक्षा महान आहे. शिक्षणाने माणूस सुशिक्षित होण्याबरोबरच सुसंस्कारित व्हावा हा शिक्षणाचा मुख्य उद्देश असतो. मंगलताईंताईंनी लौकिक अर्थाने उच्च शिक्षण अथवा पदव्या घेतल्या नसल्या तरी व्यवहाराच्या दुनियेत त्यांनी अनुभव संपन्न होऊन सामाजिक बांधिलकी जपली आहे.

सौ. मंगताईंचे १९७२ पासून घरी चार ते पाच बाळंतिणींसाठी दुधा तुपाचा, चांगला पौष्टिक अन्नाचा डबा तयार करून देणे सुरू केले. याचबरोबर अनाथ आश्रमातील मुलींना आश्रमामध्ये जाऊन आंघोळी घालणे, वेण्या घालून देणे, चांगले संस्कार करणे हे कार्य सुरू होते.

**'' मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलतांना**
**त्या अनाथांच्या उशाला दीप लावू झोपताना**
**कोणती ना जात त्यांची कोणता धर्म ज्यांना**
**दुःख भिजले दोन अश्रू माणसाचे माणसांना ''**

या बालकांना माया, प्रेम, जिव्हाळा, योग्य औषधोपचार मिळावे हा त्यांचा मूलभूत हक्क ! दोन बालकांच्यासाठी चालू झालेला '' प्रभा हिरा प्रतिष्ठान '' पंढरपूर संचलित '' पालवी '' हा प्रकल्प महाराष्ट्रातील एचआयव्हीबाधित मुलांचा संगोपन प्रकल्प ठरला आहे. पालवी संस्थेमध्ये सध्या २०० पेक्षा जास्त एड्सग्रस्त बालकांचे मोफत संगोपन केले जात आहे. या बालकांना निवास, भोजन, शिक्षण, वैद्यकीय उपचार, स्वयंरोजगार इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात. त्यांच्यासाठी शाळा, संस्कार, वैद्यकीय उपचार, स्वावलंबन असे बरेच प्रकल्प चालू झाले आहेत.

**'' हरवले आभाळ ज्यांचे हो तयांचा सोबती**
**सापडेना वाट ज्यांना हो तयांचा सारथी**
**जाणवाया दुर्बलांचे दुःख आणि वेदना**
**तेवत्या राहो सदा रंध्रातुनी संवेदना**
**धमण्यातल्या रुधिरास या खल भेदण्याची आस दे**
**सामर्थ्य या शब्दांस आणि अर्थ या जगण्यास दे ''**

या ओळींप्रमाणे ज्यांच्या जगण्याला अर्थ नव्हता, कोणतेच परिमाण नव्हते अशा वंचित, दुर्बल, निराधार आणि समाजाकडून सातत्याने हेटाळणी सहन करणाऱ्यांच्या जगण्याला सौ. मंगलताईंनी अर्थ प्राप्त करून दिला. त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला, त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. मंगलताईंनी अशा एड्सबाधित, मनोरुग्ण, निराधारांना मायेनं कवेत घेऊन त्यांना निरागस, पवित्र आणि भावनाशील प्रेम दिलं. आपुलकीने, हळव्या स्पर्शाने, ममतेने मायेची ऊब दिली. त्या त्यांच्या जगण्याच्या आधार बनल्या.

**'' जे का रंजले गांजले**
**त्यांसी म्हणे जो आपुले**
**तोचि साधू ओळखावा**
**देव तेथेचि जाणावा ''**

या संत तुकारामाच्या अभंगातील कडव्याप्रमाणे मंगलताईंनी कुष्ठरोगी, एचआयव्हीबाधित, मनोरुग्ण, अनाथ, निराधार माणसात देव पाहिला आणि आपले सेवाव्रत त्यांनी आयुष्यभर निभावले आणि निभावत आहेत. ज्यांचं या जगात कोणी नाही, त्यांच्या मंगलताई झाल्या आई असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

सौ. मंगलताईंनी वेश्या वस्तीमध्ये एड्सविषयी प्रबोधन, शाळा, कॉलेज, वाडया-वस्तीवर पथनाटय, नाटकांद्वारे एड्स प्रबोधन केले. प्रामुख्याने महिलांमध्ये वाचनाची रुची वाढावी यासाठी १९८१ पासून शब्दशिल्प वाचनालयामार्फत मोफत वाचनालय सुरु केले. २००१ मध्ये एचआयव्हीसह जगणा-या अनाथ बालकांकरिता चालू झालेल्या महाराष्ट्रातील पहिल्या प्रकल्पाचे काम आज अनेक प्रकल्पांपर्यंत विस्तारले गेले आहे यातून मंगलताईंचे सामाजिक दायित्व निदर्शनास येते.



मंगलताईंचे पुढील स्वप्न एका विस्तीर्ण जागेत सेवातीर्थ उभे करायचे हे आहे. खास करुन मनोरुग्ण महिला ज्यांना कोणीही नाही अशा मनोरुग्ण महिलांच्या हाताला काम मिळावे त्या आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी उद्योग व विक्री केंद्र उभा करुन देणे, वंचित मुलांसाठी



डॉ.शिवाजी नारायणराव शिंदे
सहायक कुलसचिव,
पु.अ.होळकर, सोलापूर विद्यापीठ
९३७०६२१४७५

३ वर्षापासूनचे शैक्षणिक गुरुकुल उभारणे, सर्व संगोपन विभाग एकाच छताखाली आणण्यासाठी विस्तीर्ण जमीन शोधणे अशा अनेक सामाजिक कार्यासाठी पंढरपूरात लवकरच लोकसहभागातून '' पालवी सेवातीर्थ पंढरपूर'' उभे करणे हा मंगलताईंचा उद्देश आहे. या सर्व कामात आपणास ताईंची कन्या डिंपलताई, जावई राजकुमार सर, आपले सुपुत्र आशिष सर, स्नुषा ऋतुजा ताई, नातू तेजस, नात कोमल आणि संपूर्ण पालवी परिवार यांची समर्थ साथ आणि सहकार्य लाभत आहे.

समाजातील अनेक घरात बोज वाटणाऱ्या, नको असलेल्या वयोवृद्ध व्यक्ती तीर्थक्षेत्री आणून सोडतात. यामध्ये अत्याचारित, परित्यक्त्या, व्याधिग्रस्त महिला, मनोरुग्ण, अपंग, बालक व पालक या सर्वांसाठी एक घर उभा करण्याचा मंगलताईंचा मानस आहे. हे घर सर्वांना सुरक्षितता, सन्मान देणारं, मानसिक व शारीरिक आधार देणारं घर असेल ! यातून त्यांच्या बहुआयामी कार्याचे दर्शन घडते.

आजपर्यंत सौ. मंगलताईंनी विविध क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाबद्दल त्यांना नामांकित असे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात लोकमत सखी मंच, सोलापूरचा सखी सन्मान पुरस्कार , इनरव्हील क्लब, टेंभूर्णीचा ममता पुरस्कार , लोकसत्ता वृत्तपत्र, मुंबईचा लोकसत्ता दुर्गा जीवनगौरव पुरस्कार , सहारा अनाथालय परिवार, गेवराईचा भान तरुणाई पुरस्कार , सुप्रियाताई सुळे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दिलेला सोलापूरचा महिला अधिकृत पुरस्कार , हिडन टॅलेंट कल्चरल प्लॅटफॉर्म, पुणेचा आदर्श माता पुरस्कार , संजीवनी योग सेवा संस्था, इंदापूरचा सेवाभावी पुरस्कार , राजमाता शिक्षण प्रसारक मंडळ, भोसरी, पुणेचा राजमाता जिजाऊ पुरस्कार , शांतीदूत परिवार, पुणेचा '' शांतीरत्न पुरस्कार , ठुसे परिवार, ठाणेचा श्रीमती गिरीजा एकनाथ ठुसे सेवाव्रती पुरस्कार , छाया प्रकाश फाउंडेशन, सोलापूरचा '' उर्जा पुरस्कार , संभाजी ब्रिगेड, पंढरपूरचा गौरव जिजाऊंच्या लेकीचा पुरस्कार , सुप्रीम मास्टर चिंग है सिंगापूरचा शायनिंग वर्ल्ड कम्पॅशन अवॉर्ड , अक्कलकोट महाराज फिल्म्स पुणेचा प्रेरणादायी व्यक्तिमत्व पुरस्कार , या पुरस्कारासह त्यांना आजपर्यंत विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय संस्थानी २०० हून अधिक पुरस्कार देऊन सन्मानीत केले आहे

काही पुरस्कारामुळे त्या व्यक्तीला मोठेपण प्राप्त होतं तर काही व्यक्तींच्या असामान्य कार्यामुळे त्या पुरस्काराला गरिमा प्राप्त होते. मंगलताईंचं कार्य अद्वितीय असं आहे त्यामुळे या सर्व पुरस्कारांची उंची देखील निश्चित वाढली आहे.

**देखणी ती जीवने जी तृप्तीची तिर्थोदके**
**चांदणे ज्यातून वाहे , शुभ्र पाऱ्यासारखे !**

काही आयुष्य म्हणजे खरंतर तीर्थस्थानं असतात. चंदनाचा सुवास आसमंतात पसरल्यावर जसा अवघ्या सृष्टीचा त्यावर हक्क असतो तशी काही आयुष्यं सगळ्यांच्या हक्काची असतात.सौ. मंगलताई ह्या पालवीचं तीर्थस्थान, पालवीचं आभाळ, पालवीच्या अन्नपूर्णा आहेत. '' पालवी '' तील एड्सबाधित मुलांच्या आई झाल्या आहेत.

सामाजिक क्षेत्रातील मंगलताईंच्या उत्तुंग यशाबद्दल त्यांना २०२५ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा '' जीवनगौरव पुरस्कार '' देऊन सन्मानीत करण्यात आलं आहे. त्यांच्या भविष्यकालीन वाटचालीस मनापासून शुभेच्छा !!






# सोलापूर एक धार्मिक पर्यटन केंद्र

**सोलापूर जिल्ह्याला मोठा इतिहासाचा वारसा असून येथे अनेक ऐतिहासिक स्थळे, किल्ले, स्मारके, धार्मिक स्थळे आणि मंदिरे आहे. सोलापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळे म्हटलं की नजरेसमोर येतात दक्षिण भारताची काशी असलेले पंढरपूर येथील श्री.विठ्ठल मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिर,सोलापुर शहरातील सिद्धेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर , रेवणसिद्धेश्वर मंदिर, श्री वीर तपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामी मंदिर, माचनुर येथील सिद्धेश्वर मंदिर, हत्तरसंग कुडल संगम येथील संगम `श्वर व हरिहरेश्वर मंदिर, वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर मंदीर, करमाळा येथील कमला देवी मंदिर, बार्शी येथील भगवान मंदिर, सांगोला येथील अंबिका मंदिर.**

मागील काही वर्षांमध्ये सोलापूर येथील ऐतिहासिक स्थळे हे पर्यटनाचे आकर्षण केंद्र बनत आहे. येथे पर्यटकांची संख्या वाढत आहे याची कारणे पुढीलप्रमाणे लोकांमध्ये ऐतिहासिक स्थळांविषयी निर्माण झालेली आवड, पर्यटकांना नवीन ऐतिहासिक स्थळे पाहण्याची जिज्ञासा, स्वतःच्या गावातील व गावाच्या अवतीभोवती असलेले ऐतिहासिक स्थळ याबद्दल वाढलेलं आकर्षण व पर्यटक सप्ताहाच्या शनिवार व रविवार या दिवशी प्रवास करण्याकडे झुकलेला दिसतोय कारण त्यांचा वेळ तर वाचतो आहेच त्याचबरोबर खर्च सुद्धा कमी होतो.




- डॉ. व्यंकटेश मेतन

वाईल्डलाइफ फोटोग्राफर

९३७००८००९०


या लेखामध्ये सोलापूर उदयास येत असलेलं तीन धार्मिक पर्यटन केंद्र, माचनुर येथील सिद्धेश्वर मंदिर, हत्तरसंग कुडल संगम येथील संगमेश्वर व हरिहरेश्वर मंदिर, वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर मंदीर या तीन मंदिराविषयी संक्षिप्तात माहिती मांडत आहे. हत्तरसंग कुडल संगम येथील संगमेश्वर व हरिहरेश्वर मंदिर हे धार्मिक पर्यटन केंद्र बनण्यासाठी सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाच्या नियोजनामध्ये सल्लागार म्हणून काम करीत असून हि दोन्ही मंदिर आणि तेथील परिसर लवकरच राष्ट्रीय पातळीवरील धार्मिक पर्यटन केंद्र होईल. हत्तरसंग कुडल संगम येथील संगमेश्वर व हरिहरेश्वर मंदिर यावर पुस्तिका प्रकाशित केली असून लवकरच माचनुर येथील सिद्धेश्वर मंदिर व वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर मंदीर पुस्तिका प्रकाशित करीत आहे

**हत्तरसंग कुडल संगम येथील संगमेश्वर व हरिहरेश्वर मंदिर**

सोलापूर जिल्ह्यातील अनेक सुंदर मंदिरांपैकी श्री. संगमेश्वर मंदिर आणि श्री. हरिहरेश्वर मंदिर हि प्रख्यात ऐतिहासिक मंदिरे हत्तरसंग येथील पवित्र कुडल संगमावर वसलेली आहेत. ११व्या ते १२व्या शतकातील ही मंदिरे चालुक्य युगातील ङ्गकल्याणी चालुक्यङ्ग चे विक्रमादित्य ह्या सहाव्या राजाच्या कारकिर्दीत बांधली आहेत.

**येथील प्रमुख आकर्षणे:**

मंदिरांमध्ये मराठी भाषेतील पहिला शिलालेख ङ्गवाची ते विजया होइवाङ्ग लिहलेला असून त्यावर त्याचा कालखंड ए.डी. १०११ असा उल्लेख आहे.

येथे 'जगातील एकमेव दुमिळ बहुमुखी शिवलिंग असून या लिंगांची उंची ११७ सेमी, घेर सुमारे ४ मीटर असून त्याचे वजन ४ टन आहे. या लिंगावर शिवाचे ३५९ चेहरे कोरलेले आहेत.

हरि म्हणजे भगवान विष्णू आणि हर याचा अर्थ शिव, शिव आणि वैष्णव या दोन पंथांना एकत्र जोडण्यासाठी देव एकच आहे हे दर्शविणे या मंदिराचे मूळ तत्व आहे.येथे भीमा व सीना नदीचे पवित्र संगम असून दोन्ही नद्या एकमेकांना काटकोनात मिळतात.

येथे एक अनोखा रंगमंडप आहे असून हरिहरेश्वर मंदिराच्या आतील चारही भिंतींवर अप्रतिम कोरीव काम आहे.

या संगमाचे महत्त्व म्हणजे प्राचीन काळात उत्तरेकडून दक्षिण किंवा दक्षिण ते उत्तरेकडे प्रवास करणारे प्रवासी लोक या पवित्र स्थानी मुक्काम करून पुढचा प्रवास करीत.

**माचनुर येथील सिद्धेश्वर मंदिर**

श्री. सिद्धेश्वर मंदिराचा समुह परिसर अत्यंत सुंदर, प्रसन्न व शांत असून तो काळ्या पाषाणात बांधलेला आहे. हे यादव कालीन मंदिर १६ व्या शतकात बांधले असावे. मंदिराच्या उत्तरदिशेला पंढरपुर येथील विठ्ठलाचा पदस्पर्श होऊन आलेली पवित्र भीमा नदी वहात येते.

या भागाचे नाव माचणूर कसे पडले याबद्दल एक दंतकथा प्रचलित आहे. औरंगजेबाने हा प्रदेश जिंकल्यावर आपल्या सैनिकांना पवित्र श्री सिद्धेश्वराचे शिवलिंग फोडण्याची आज्ञा केली. पण त्यासाठी गेलेल्या सैनिकांवर भुंग्यांच्या थव्याने हल्ला चढविला, त्यामुळे त्यांना परत फिरावे लागले. या प्रकाराने संतापलेल्या औरंगजेबाने श्री शंकरांचा उपमर्द करण्यासाठी नैवेद्य म्हणून मांसाचा नैवेद्य पाठवला, पण श्री सिद्धेश्वराचे पुढ्यात ठेवलेल्या नैवेद्याचे ताटावरील वस्त्र बाजूला केल्यावर मांसाच्या जागी चकाकणारी पांढरी शुभ्र फुले दिसली. मांसाचा नूर पालटला त्यामुळे या ठिकाणाला मासनूर असे म्हटले जाऊ लागले. पुढे याचाच अपभ्रंश होऊन गावाचे नाव माचणूर झाले.

**येथील प्रमुख आकर्षणे:**

मुख्यप्रवेशद्वारातून प्रवेश केल्यानंतर डाव्या बाजूला सुंदर प्राचीन श्री मल्लिकार्जुन मंदिर आणि या पहारेकऱ्यांसाठी टेहळणीकरिता एक बुरुज.

श्री. सिद्धेश्वर मंदिर हे अतिशय सुंदर, घडीव आणि अप्रतिम शिल्पकामाने सजलेलं प्राचीन मंदिर हेमाडपंथी पद्धतीने बांधलेले आहे.

श्री सिद्धेश्वर मंदिरात उत्तर दिशेकडून प्रवेश करताना अर्धमंडपात सुबक, कोरीव व सुंदर तीन फुटी दगडी बसलेला नंदी आहे. ह्या नंदीच्या चारी पायांपेक्षा पुढील उजवा पाय वेगळा असून ह्या पुढील उजव्या पायावर हळुवारपणे ठोका दिल्यास त्याचा वेगळा ध्वनी येतो.

मंदिरातील गर्भग्रहात जाण्यासाठी छोट्याशा दारातून भाविकांना बसून प्रवेश करावा लागतो.

गर्भगृहामध्ये श्री सिद्धेश्वर महादेवाचे सुंदर शिवलिंग असून त्यावर चांदीचा भव्य मुखवटा आहे.

मंदिराच्या उत्तर दिशेकडील दरवाज्यातून गेल्यानंतर अहिल्याबाई होळकर यांनी भव्य व सुंदर दगडी घाट बांधलेला आहे.

भीमानदीच्या पात्रात मध्यभागी श्री. जटाशंकराचे छोटेसे परंतु सुबक व देखणे मंदिर आहे.

श्रीक्षेत्र माचणूर ही प्राचीन तपस्याभूमी असून 'नाथांचे ठाणे' म्हणून ओळखले जाते.

मंदिराच्या परिसरात श्री संत बाबामहाराज आर्वीकर यांचे मोक्षधाम आश्रम, समाधि मंदिर, प्रार्थना मंदिर, रामवृक्ष मंदिर, ध्यान मंदिर, शिवलिंग मंदिर आहे. हा परिसर खूप पवित्र, प्रसन्न, इतका निवांत व रमणीय आहे की इथे कुठेही बसल्यास साधकाची वृत्ती सहजीच अंतर्मुख होऊन जाते व भान कुठस्थाकडे केंद्रित होते.

**वेळापूर येथील हरनारेश्वर महादेव मंदिर / अर्धनारीनटेश्वराचे मंदिर**

सोलापूर जिल्ह्यातल्या माळिशरस तालुक्यातील वेळापूर येथील हरनारेश्वर महादेव मंदिर हे अर्धनारीनटेश्वराचे मंदिर आहे. हेमाडपंथी वास्तु-पद्धतीचे हे बांधकाम असून यादव राजा रामचंद्र (१२७१ ते १३१०) यांच्या बद्दलचे शिलालेख या देवळाच्या भिंतींवर कोरलेले आहेत. मराठी आणि संस्कृत भाषेत असणाऱ्या या शिलालेखांत देवराव यांच्या नावाचा उल्लेख आहे.



### येथील प्रमुख वैशिष्टे

- गाभाऱ्यातील दरवाजावर गणपतीऐवजी 'गजलक्ष्मी' कोरलेली आहे.
- महादेव मंदिराच्या आत आणि बाहेर दोन नंदी आहेत.
- एकाच लिंगावर अर्ध्याबाजूस शंकर आणि अर्ध्यबाजूस पार्वती यांची सुबक व कोरीव मूर्ती आहे.
- येथील काही मूर्तीवर हात फिरविल्यास किंवा टिचकी मारल्यास सप्तसूर निघतात.
- पार्वती मातेच्या पायावर एक चक्र आहे. यादवांच्या काळापर्यंत वेळापूरचे नांव एकचक्रनगर असे होते.
- यादव राजा रामचंद्र (१२७१ ते १३१०) यांच्या बद्दलचे शिलालेख या देवळाच्या भिंतींवर कोरलेले आहेत.
- शिलालेखात दिलेल्या माहिती नुसार इ.स. (१२७१ ते १३१० ) या ठिकाणच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केल्याचे आढळून येते.
- वेळापूरचा भाग महाभारतातील दंडकारण्यात समाविष्ट होतो.
- देवगिरीची दक्षिण सीमा म्हणजे वेळापूर. वेळ म्हणजे सीमा. पूर म्हणजे भोवती तटबंदी असलेले गांव.
- वेळापूर येथे उपराजधानीप्रमाणे यादवांचे लष्करी ठाणे होते.
- पुरातन खात्याने १९७० साली मूर्ती संग्रहालय बांधले आहे.

# गुणवत्तेला प्राधान्य देणारे सांगोला महाविद्यालय

**माणदेशातील सांगोला तालुक्याच्या इतिहासाची पाने चाळली असता या तालुक्यामध्ये सत्तर ते ऐंशीच्या दशकामध्ये उच्च शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती. दुष्काळ पाचवीला पुजलेला असताना निसर्गाशी दोन हात करीत इथला माणूस जगण्याचे आव्हान पेलत होता. साहित्याच्या प्रांतात ग.दि.म डगुळकर, व्यंकटेश माडगुळकर, शंकरराव खरात या लेखकांमुळे आपल्या माणदेशाची अस्सल ओळख उभ्या महाराष्ट्राला होवू लागली होती. त्या काळात विकासापासून कोसो दूर असलेल्या सांगोला तालुक्याची प्रगती करायची असेल, तर उच्च शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. हे जाणून कै.बापूसाहेब झपके, कै. संभाजीराव शेंडे, कै.बजरंग आबा लोखंडे, कै.मा.ज.घोंगडे आदी त्याकाळातील जाणत्या मंडळीनी १९७८ साली सांगोला महाविद्यालय सुरू केले.**

आज राजकारणातील नैतिकता आणि शेतीतील प्रगती पाहण्यासाठी राज्यातील लोक सांगोल्याला येतात. आज शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत ही सांगोला एक शैक्षणिक हब होत आहे. तालुक्याच्या या प्रगतीमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या सांगोला महाविद्यालयाचा सिंहाचा वाटा आहे. सांगोला येथील सांगोला म




प्रा.संतोष लोंढे

सांगोला महाविद्यालय, सांगोला

मो.नं.९७६६२८०४०४


हाविद्यालयाची सुरूवात सांगोला विद्यामंदिर प्रशालेमध्ये नव्वद विद्यार्थांवर झाली. आज या महाविद्यालयाची आठ एकर जागेमध्ये तीन मजली इमारत आहे. भव्य क्रीडांगण, ग्रंथालय, वसतिगृह, संगणक कक्ष आहेत. येथे सुमारे अडीच हजार विद्यार्थी पदवी ते पीएच.डी. चे शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी त्यांच्या जीवनामध्ये यशस्वी झाले आहेत. तालुक्याच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, कृषी, साहित्य, पत्रकरिता, प्रशासन, कायदा आणि उद्योग क्षेत्राच्या विकासामध्ये सांगोला महाविद्यालयाचा महत्वाचा वाटा दिसतो. आज महाविद्याल्याच्या संगणक शाखेचे अनेक विद्यार्थी परदेशामध्ये नोकरी करत आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्रामध्ये असताना सांगोला महाविद्यालयाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. आज या महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तेच्या बळावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये ही आपली नावाचा दबदबा निर्माण केला आहे.

या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे विशेष लक्ष दिले जाते. प्रेरणा, भित्तीपत्रक आणि माणदेश वार्षिक नियतकालिकामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याला वाव मिळतो. माणदेश मध्ये आपल्या लेखनाची सुरूवात करणारे अनेक विद्यार्थी, लेखक म्हणून आज प्रसिद्ध आहेत. वामन जाधव, जोतीराम फडतरे, सुनील जवंजाळ, मुकूंद वलेकर, देवदत्त धांडोरे, महेश पत्की, दत्ता सरगर, महादेव कांबळे, योजना मोहिते, योगिता पाटील, कै. दिनकर कुटे याचाच अर्थ या महाविद्यालयामध्ये साहित्याला पोषक असे वातावरण मिळते. या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थ्यांनी राज्यातील नामवंत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धामध्ये यश संपादन करीत आहेत. सांस्कृतिक विभागाचे माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनतेला वाव मिळत आहे. विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये ही महाविद्यालयाचे विद्यार्थी चांगले यश संपादन करीत आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिकतेचे धडे मिळत आहेत. एन.सी.सी.चे अनेक विद्यार्थी भारतीय सीमेवर देशाचे रक्षण करत आहेत. महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्रिडाप्रकारामध्ये विद्यापीठ व राज्यपातळीवर यश संपादन करत आहेत.

हे महाविद्यालय नेहमीच विद्यार्थी केद्रबिंदू ठेऊन कार्यरत आहे. या महाविद्यालयामध्ये कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून गरीब व होतकरू काम देऊन त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावला जातो. विद्यार्थी सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाते. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी दत्तक-पालक योजनेच्या माध्यामातून विद्यार्थ्यांचाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी राजकारण, वकिली, पत्रकारिता आदी क्षेत्रामध्ये यशस्वी झाले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मागील परीक्षेमध्ये या महाविद्यालयाच्या




सहा विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक पटकाविले. इतर अकरा विद्यार्थी विद्यापीठ परीक्षमध्ये गुणवत्ता यादीमध्ये चमकले. महाविद्यालातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पोस्ट, बँक, रेल्वे व राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षामध्ये यश संपादन करून प्रशासनामध्ये कार्यरत आहेत. थोडक्यात या महाविद्यालयाने विद्यार्थी केंद्रबिंदू मानून गुणवत्तेला प्राधान्य दिलेले दिसते.

### गुणवत्तेवरच प्राध्यापक भरती

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये प्राध्यापक भरती करताना आज देणगीच्या नावाखाली मोठी आर्थिक उलाढाल होताना दिसते. हे लाखातील आकडे आता कोटीकडे चालले आहेत. या महाविद्यालयामध्ये मात्र प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी भरती गुणवत्तेवर होत आहे. सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष ता.ना.केदार, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ऍड. उदय घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य विश्वनाथ चव्हाण, म.सि.झिरपे, सोमनाथ ढोले, रावसाहेब ताठे, डॉ.संजीवनी केळकर, शामराव लांडगे, सुरेश फुले आदी संस्था पदाधिकारी आपल्या पूर्वसुरींनी घालून दिलेला पारदर्शकतेचा वारसा विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पुढे चालवत आहेत. अर्थातच या महाविद्यालयामध्ये गुणवत्तेला महत्व दिले जात आहे. डॉ.सुरेश भोसले हे या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून धुरा सांभाळत आहेत.

### प्राध्यापकसह विद्यार्थ्यानाही पेटेंट

या महाविद्यातील प्राध्यापक डॉ.प्रकाश बनसोडे यांच्या स्त्री कर्क रोगावरील संशोधनास पेटेंट मिळाले आहे. डॉ.रमेश टेंभुरणे यांच्या बांबूच्या नळीमधील बियाणे साठवणुकीसाठीच्या संशोधनास पेटेंट मिळाले. डॉ. विधीन कांबळे, प्रा.आशंक भोसले, प्रा.कु.सीमा बिचुकले आणि विद्यार्थी जीशान मुलानी यांच्या शेतीतील कीड व किटक पकडण्यासाठी तयार केलेल्या सापल्यास नुकतेच इंग्लंड मधील पेटेंट मिळाले आहे. यावरून हे महाविद्यालय गुणवत्तेला प्राधान्य देताना दिसते.

### विद्यार्थ्याच्या भाकरीची व्यवस्था करणारे महाविद्यालय

आजच्या परिस्थितीत हातात पदवी घेऊन समाजात सुशिक्षित बेकारांची फौज विविध महाविद्यालयांमधून बाहेर पडत आहे. सांगोला महाविद्यालयामध्ये मात्र विद्यार्थ्यांना काही प्रमाणात रोजगार मिळत आहे. महाविद्यालयातील संगणक विभागामध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेस्मेंटसाठी येत आहेत. सन २०२४-२०२५ मध्ये या महाविद्यालयातील २८९ विद्यार्थ्याना आय.टी.कंपन्यांमध्ये रोजगार मिळाला. त्याच्या हाताला काम मिळाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भाकरीही व्यवस्था करणारे महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाची ओळख निर्माण होत आहे. महाविद्यालयामध्ये जिल्ह्याबाहेरील ही विद्यार्थी शिक्षणसाठी येत आहेत.

## सहकार तपस्वी कै. तात्यासाहेब देशमुख यांनी स्थापन केलेल्या श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्थेची सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल

बार्शीतील श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित बार्शी या संस्थेची स्थापना दि. १९ जुलै १९८३ रोजी झाली. आज या संस्थेस ४२ वर्षे पूर्ण झाली आहेत. या संस्थेची सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल अतिशय उत्तम पद्धतीने चालू आहे.

संस्थेची स्थापना आर्थिक दुर्बल घटकांना अर्थसहाय्य करणे व सभासदांच्या ठेवी स्वीकारणे व त्यांचे हित जपणे या मूळ उद्देशानी केली गेली आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बल समाजाचे सक्षमीकरण करणेकरिता नेहमीच संस्था अग्रेसर असते. संस्थेची स्थापना सहकार तपस्वी कै. ल.ग. तथा तात्यासाहेब देशमुख यांनी केली असून संस्थेचे मुख्य कार्यालय आणि ३ (तीन) शाखा असून त्या स्वमालकीच्या इमारतीमध्ये आहेत. संस्थेच्या एकूण ठेवी ५५ कोटींपेक्षा अधिक असून अल्पावधीतच ६० कोटींच्या पुढे असतील. गुंतवणूक २७ कोटी व खेळते भाग भांडवल ७३ कोटी आहे. तसेच संस्थेचे कर्ज वाटपदेखील मोठ्या प्रमाणात आहे. संस्थेच्या सभासदांसाठी तीनही शाखांमध्ये लॉकर सुविधा उपलब्ध केली आहे.

गेली ४० पेक्षा जास्त वर्षे संस्थेचे चेअरमन म्हणून डॉ. बी.वाय. यादव आहेत. तसेच संस्थेचे सध्याचे व्हाईस चेअरमन अॅड. श्री. आसिफभाई तांबोळी आहेत. या दोघांचे व संचालक मंडळाचे मार्गदर्शनाखाली संस्था प्रगतीपथावर काम करीत आहे. तसेच संस्थेने आजपर्यंत सभासदांना १५ टक्के लाभांश दिलेला आहे.





संस्था सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी विविध उपक्रम राबवते व आर्थिक मदत देखील करते. जसे की, बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकट दिनाच्या वेळेस आर्थिक स्वरुपात सहाय्य करणे, देशामध्ये जेव्हा जेव्हा नैसर्गिक आपत्ती येते तेव्हा संस्था नेहमीच अग्रेसर असते. सांगली पूरग्रस्तांना धान्य व प्रापंचिक साहित्य पुरवले. त्सुनामी पंतप्रधान निधी, वॉटर कॅम्प, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन सहाय्यता, कै. मामासाहेब जगदाळे जनजागरण रॅली व पैगंबर जयंती रॅलीमध्ये खाऊ वाटप, राम मंदिर प्रतिष्ठापनाप्रसंगी अर्थसहाय्य, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ट्रामा केअर सेंटर यांना अर्थसहाय्य, कोविड काळामध्ये सस्थेच्या सभासदांना, ज्येष्ठ नागरिकांना घरपोच सेवा व नेत्र रुग्णांना चष्मा वाटप संस्थेच्यावतीने सामाजिक बांधिलकी लक्षात घेवून करण्यात आले. तसेच संस्थेने महिला सभासदांसाठी पैठणी महोत्सव व रजतसमृद्धी महोत्सवसारख्या योजना देखील राबविल्या. पंतप्रधानांच्या आवाहनास प्रतिसाद देत भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच या राष्ट्रीय धोरणात्मक योजनेंतर्गत क्षयरोग मुक्त भारत हे उद्दिष्टपूर्तीई करण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत हे अभियान राबविण्यात येत आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत संस्थेने खारीचा वाटा म्हणून क्षय रुग्णांना पौष्टिक आहाराचा पुरवठा केला आहे. संस्थेने ही मदत रुग्णांना घरपोच केली आहे.

संस्थेला अनेक नामवंत मंडळींनी व केंद्रीय मंत्र्यांनी भेटी दिल्या आहेत. त्यात मा. श्री. गोपीनाथजी मुंढे, मा.श्री. हरिभाऊ बागडे, मा.श्री. प्रकाश जावडेकर, मा.श्री. श्रीपाद नाईक (गोवा), माजी खा. बाळासाहेब आपटे तसेच रिझर्व्ह बँकेचे सल्लागार मा.श्री. सतीश मराठे, केंद्रीय अनुचित जाती-जमातीच्या श्रीमती सुरेखा लामतुरे व इतर अनेक मान्यवर यांनी भेट देवून मार्गदर्शन केले.

संस्था याही पुढे जाऊन अनेक उत्तम योजना राबविण्याच्या प्रयत्नात आहे. संस्थेचे सरव्यवस्थापक श्री. अनिल रा. बनसोडे यांच्या कार्यकुशलतेखाली संस्था प्रगतीपथावर मार्गक्रमण करत आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील ९० वर्षे पूर्ण झालेल्या नामांकित शिक्षण संस्था - बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शीच्या कार्याचा आढावा

बार्शीतील बार्शी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. भगवंत पंढरीनाथ तथा काकासाहेब सुलाखे हे सोलापूर जिल्ह्यातील एक नामांकित कायदे पंडीत, यशस्वी उद्योगपती आणि बार्शी शहरातील प्रमुख नागरिक होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला आणि सामाजिक सेवेच्या जाणिवेतून त्यांनी भरीव असे ऐतिहासिक कार्य केले.



बार्शी एज्युकेशन सोसायटी ही संस्था आज महाराष्ट्रात एक अग्रगण्य संस्था आहे. १९१८ साली लोकमान्य टिळक बार्शीला आले होते. बार्शीच्या भगवंत मैदानावर 'राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता' या विषयावर त्यांचे त्यावेळी भाषणही झाले होते व त्यातून प्रेरणा घेऊन कै. काकासाहेबांनी बार्शीत शाळा काढण्याचे ठरविले. १९२४ च्या गुढीपाडव्याला हा संकल्प जाहीर झाला आणि २५ विद्यार्थी व २ शिक्षकांच्या भांडवलावर 'न्यू इंग्लिश स्कूल' या नावाने शाळा सुरु केली. त्यात कै. काकासाहेब सुलाखे यांच्या नेतृत्वामुळे व कार्यकुशलतेमुळे या लहानशा शाळेचे रुपांतर १९३७ साली 'सुलाखे हायस्कूल' या नावाने झाले. बार्शी एज्युकेशन सोसायटी बार्शी या संस्थेच्या आरंभापासून कै. काकासाहेब सुलाखे हे अध्यक्ष होते. आज सुलाखे हायस्कूलमध्ये जवळपास २,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शब्दांकन
**अनंत गो. कवठाळे, सचिव**

सन १९४० मध्ये मुलांसाठी 'नवीन मराठी शाळा' सुरु केली. शहरातील पहिली खाजगी प्राथमिक शाळा आहे. मुलींकरिता त्यांनी एक शाळा सुरु केली. सहशिक्षणाचे तत्त्व आल्यावर सन १९५० साली मुलींची शाळा मुलांच्या शाळेत विलीन झाली. आज ही शाळा 'नवीन मराठी शाळा' या नावाने सोलापूर जिल्ह्यात दबदबा निर्माण झालेली एक शाळा आहे. १ ऑगस्ट १९४६ मध्ये 'शिशुविहार केंद्र' सुरु करण्यात आले. या शाळेत आता जवळपास ३५० विद्यार्थी शिशु गटात शिक्षण घेत आहेत. कै. काकासाहेब सुलाखे यांच्या हयातीत 'सुलाखे हायस्कूल' बाळेश्वर नाक्यालगत असलेल्या स्वतःच्या जागेत स्थलांतरीत झाले. सध्या बार्शी एज्युकेशन सोसायटी, बार्शी या संस्थेमार्फत सुलाखे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल, बार्शी. नवीन मराठी शाळा, बार्शी. श्रीमती मंगलाताई सुलाखे शिशुविहार, बार्शी.

सुलाखे इंग्लिश मिडियम स्कूल, बार्शी. सुलाखे प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल, बार्शी. सुलाखे कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बार्शी. सुलाखे कॉलेज ऑफ कॉम्प्युट, मॅनेजमेंट अँड रिसर्च, बार्शी यशस्वी वाटचाल करीत आहेत. या सुलाखे संकुलात सुमारे ४,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.कै. काकासाहेब सुलाखे यांनी शैक्षणिक क्षेत्रात नव्हे तर अनेक विविध क्षेत्रात स्वकर्तृत्वाने ठसा उमटविला. प्रामुख्याने बार्शीतील श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी, सार्वजनिक वाचनालय, महिला मंडळ, अनाथ विद्यार्थी गृह, समर्थ व्यायाम शाळा इ. बार्शीतील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉमर्स कॉलेजला भरघोस देणगी देऊन त्यांच्या निर्माणास हातभार लावला. कै. काकासाहेबांची जनकल्याणाची तळमळ वाखाणण्याजोगी निश्चितच आहे.

कै. काकासाहेबांनी परिश्रमाने, अभ्यासाने, उदारतेने, त्याग भावनेने प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटविला होता. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सध्याचे विश्वस्त वाटचाल करीत आहेत.

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा !



* शुभेच्छुक *
श्री. शिवाजी दगडू गलांडे,
श्री. तानाजी शिवाजी गलांडे,
अॅड. संभाजी शिवाजी गलांडे
३८४७, भवानी पेठ, बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारतच्या वर्धापनदिनास
हार्दिक शुभेच्छा !



Mob. : 9767833939
9673753939
* शुभेच्छुक *
अॅड. अमोल एन. अलाट
M.A.,LL.B.
अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी.
ऑफिस : शिवतेज, शिवाजी नगर, माऊली चौक, देशमुख प्लॉट, अलिपूर रोड बार्शी - ४१३४११, जि. सोलापूर.

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !





* शुभेच्छुक *
सौ. ज्योती व श्री. दयानंद श्रीरंग रेवडकर
मुख्याध्यापक
वखारिया विद्यालय, उपळे दुमाला, ता. बार्शी, जि. सोलापूर

दै. तरुण भारत वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा !



सचिव | अध्यक्ष | उपाध्यक्ष
सौ. सविता जाधव | श्री. भगवान जाधव | श्री. गणेश रोडे
ज्योतिर्लिंग स्पोर्टस् क्लब
कराटे/बॉक्सींग/वुशू/स्केटिंग क्लासेस
८४५ क्रांतिसिंह नगर उपळाई रोड बार्शी.
मो. ८८३०७६५५००.,७९७२०६३०२२.

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी
पी.सी.आय.न्यु दिल्ली, महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त, एम.एस.बी.टी.ई. मुंबई व DBATU विद्यापीठ लोणेरे, रायगड संलग्नित
Choice Code : 650482310/650482311T





B. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण (PCB/PCM)
• MHT CET किंवा NEET आवश्यक
कालावधी ४ वर्ष

D. PHARMACY
शैक्षणिक पात्रता :
• १२ वी सायन्स उत्तीर्ण
• PCB/PCM
कालावधी २ वर्ष

बार्शी तालुक्यातील सर्वात पहिले औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक महाविद्यालय प्रवेश देणे चालु आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५३ विद्यार्थ्यांचे यशस्वी प्लेसमेंट

कॉलेजची वैशिष्ट्ये :
• सुसज्ज इमारत • सुसज्ज ग्रंथालय
• अत्याधुनिक लॅबोरेटरी व कॉम्प्युटर लॅब • वैयक्तिक लक्ष
• कॉलेज बस ची सुविधा • शासनाच्या ई.बी.सी./स्कॉलरशिपची सुविधा उपलब्ध
• स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन (M.Pharm DPEE) Workshop Seminar चे आयोजन
• खाजगी व्यावसायिक कंपन्यांकडून (CSR Fund) शिष्यवृत्तीची सोय.

व्यावसायिक संधी
• स्वतःचे मेडिकल शॉप
• मेडिकल रिप्रेसेंटेटीव्ह
• हॉस्पिटल फार्मासिस्ट
• क्लिनिकल फार्मासिस्ट
• औषध कंपन्यामध्ये जॉब
• पुढील शिक्षण थेट द्वितीय वर्ष बी फार्मसी/ एम. फार्मसी

अधिक माहिती व प्रवेशसाठी पुढील QR Code Scan करून ग्रुप जॉईन करा.
Admissions Helpline No.
02184-297000, 9923332316
8888178918, 9579868028

For more details, please visit : www.sojarcop.edu.in
E-mail ID : sojarcop@gmail.com
बार्शी-कुर्डूवाडी रोड, खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शिवशक्ती, आपली धनशक्ती...!
बांधीलकी व सेवेची पूर्ती २०० कोटींकडे वाटचाल



शिवशक्ती अर्बन को-ऑप बँक लि.,बार्शी
सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र असलेली व अल्पावधीत ठेवी, कर्ज व भांडवल यांचा हलता परंतु झेपावणारा आलेख, सर्व सुविधेसह आपल्या सेवेशी तत्पर असणारी बार्शीतील एक अग्रगण्य असणारी सहकारी बँक
* बँकेची ठळक वैशिष्ट्ये *
* भक्कम आर्थिक स्थितीला सुरक्षिततांची जोड * विविध आकर्षक ठेव योजनेसह ज्येष्ठ नागरिकांना जादा व्याजदर * सुसज्ज भव्य इमारत तसेच लॉकर सुविधा, एसएमएस सुविधा, ए.टी.एम. सुविधा * भारतात कोठेही आरटीजीएस/एनईएफटी सुविधा * अल्पावधीत कर्ज मिळण्याची सोय. * भविष्यात नेट बँकिंग/ई-लॉबी * ठेवी १६५ कोटी * कर्जे १०० कोटी * एकूण व्यवसाय २६५ कोटी * कर्जावरील व्याजदर ९ ते १४ टक्के * ठेवीवरील व्याजदर ८.५० टक्के पर्यंत * क्यू आर कोड सुविधा उपलब्ध
श्री. अशोक सी. वाघमारे – व्हा. चेअरमन
डॉ. श्री. प्रकाश गो. बुरगुटे – चेअरमन
श्री. गणेश बारंगुळे – सहा. सरव्यवस्थापक
श्री. भारत उमाटे – सरव्यवस्थापक
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद
७२५/१/४४ब, शिवाजी नगर, बार्शी. ता.बार्शी, जि. सोलापूर फोन (०२१८४)२२६५४३
नजिकच्या शाखेत भेट द्या.

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!





|| विना सहकारी नाही उध्दार ||
सहकार क्षेत्रातील ७७ वर्षातील विश्वसनीय वाटचाल
नोंदणी क्र. व स्थापना-सी.११६९ दि.८/३/१९४९
श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि., बार्शी.
२६३५, रुई ओळ, बार्शी, जि. सोलापूर फोन (०२१८४) २२२३१४
* ठळक वैशिष्ट्ये *
१) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., डिलरशीप १९६५ पासून
२) बार्शी पेट्रोल पंप स्थापना सन १९६७ (५८ वर्षांची विश्वसनीय परंपरा)
३) रास्तभाव धान्य दुकान स्थापना १९७० पासून
४) जामगांव पेट्रोल पंप स्थापना २००७ (१८ वर्षांची विश्वसनीय परंपरा)
५) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., (वाहतुक कॉन्ट्रॅक्टर सन २००७ पासून)
६) शासकीय व निमशासकीय योजना तालुक्यात विश्वासाने राबविणारी संस्था
७) कमर्शियल इंडेन गॅस विक्री केंद्र २०१८ पासून
८) नियोजित सी.एन.जी. जामगांव पंप
श्री. आनंद मो. कुलकर्णी – चेअरमन
श्री. उमेश शि. ठोंबरे – व्हा. चेअरमन
श्री. डॉ. बी. वाय. यादव – संचालक
श्री. नंदकिशोर ना. देशमुख – संचालक
श्री. रामचंद्र भ. गौरकर – संचालक
श्री. शब्बीर अ. तांबोळी – संचालक
सौ. माधुरी सु. गोलकोंडा – संचालक
सौ. भावना भा. नाईकवाडी – संचालक
श्री. रविंद्र मा. माचवे – व्यवस्थापक
सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद